
# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै, २०२५
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष पंचविसावे
अंक सातवा

अनुभवांनी विणलेलं जीवनचक्र,
सुधा मूर्तींच्या शब्दांनी उजळलेलं...



## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

## पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२५ मध्ये केली जाईल.
१२ जानेवारी, २०२६ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जुलै २०२५ ◆ वर्ष पंचविसावे ◆ अंक सातवा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

*– अनुक्रमणिका –*

**संपादकीय** ४
**पुरस्कार** ८
**श्रद्धांजली** ११
**पुस्तकाच्या पानांतून**
कान्होजी आंग्रे १२
हेडाम २६
आनंद जन्मला ३२
रिगेटा ४४
आयकॉन ५६
**दिनविशेष** ६१

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

# संपादकीय

## वाटा वाचनसमृद्धीच्या...

मेहता पब्लिशिंग हाऊस आणि सुधा मूर्ती हे समीकरण मराठी साहित्यात इतके रूढ आहे की, सुधाताईंची पुस्तकं म्हटलं की मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथदालनाची आठवण आपसूकच येते. या महिन्यात सुधा मूर्ती यांचे ३४वे पुस्तक आम्ही प्रकाशित करत आहोत. सुधाताईंनी कथा, कादंबरी, ललितगद्य, बालसाहित्य या साहित्यप्रकारांत जे जे लिखाण केलं आहे, ते सर्वच्यासर्व मराठी लेखकांसाठी तत्परतेने उपलब्ध करून देण्याचा मेहता पब्लिशिंग हाऊसचा प्रयत्न नेहमीच असतो. 'तीन हजार टाके' हे अनुभव कथन, 'वाइज अँड अदरवाइज', 'गोष्टी माणसांच्या' हे कथासंग्रह, 'महाश्वेता' ही कादंबरी. किशोरवयीन वाचकांसाठी लिहिलेल्या 'हरवलेल्या मंदिराचे रहस्य', 'हरवलेल्या गोष्टीचे रहस्य' या कादंबऱ्या असोत. बहुतेक सर्वच पुस्तकं प्रचंड मागणी असणारी आणि वाचकप्रिय या सदरात मोडतात.

भारतीय पुराणातील मिथकांवर आधारित 'गरुड जन्माची कथा', 'त्रिशंकु', 'कल्पवृक्षाची कन्या', 'सर्पाचा सूड', 'दोन शिंगे असलेला ऋषी' ही पाच पुस्तके ही पुराणातील अद्‌भुततेचा प्रत्यय वाचकांना देत असतात. ही पुस्तके अबालवृद्ध वाचकांमध्ये तितकीच वाचली गेलेली आजही पाहायला मिळतात. सुधाताई या कायमच सर्व वयोगटांना

आवडेल अशा प्रकारची साहित्यनिर्मिती करत असतात. बालवाचकांना नजरेसमोर ठेवून त्यांनी लिहिलेल्या ‘गोपीची डायरी’, ‘सुधा मूर्तींच्या बालकथा’, ‘गोपीची डायरी (एक उनाड दिवस) इत्यादी पुस्तके बालवयीन वाचकांमध्ये तितकीच प्रिय अशा सदरात मोडली जातात.

सुधा मूर्ती यांच्यामध्ये एक प्रेमळ आजी कायमच अनुभवायला मिळते. ही आजी कायमच नातवंडांसमोर गोष्टींची पोतडी खुली करून वाचकांना नवनव्या गोष्टी सांगत असते. ‘थैलीभर गोष्टी’, ‘आजीच्या पोतडीतील गोष्ट’, ‘आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी’, ‘आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी’ ही पुस्तकेही वाचकांच्या पसंतीस उतरली गेलेली पाहायला मिळते. सर्व वयोगटांतील वाचक नजरेसमोर ठेवून सुधाताईंनी केलेली साहित्यनिर्मिती ही आजही सुरू आहे. साहित्यक्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल सुधा मूर्ती यांना विविध पुरस्कारांनी गौरवले गेले आहे.

‘द सर्कल ऑफ लाइफ’ हे सुधा मूर्ती यांनी लिहिलेलं पुस्तक आम्ही अलीकडेच प्रकाशित केले आहे. हे त्यांचे ३४वे पुस्तक असून या पुस्तकामुळे आमच्या ग्रंथसूचीत महत्त्वाची भर पडली आहे. पाच मित्र-मैत्रिणींची कथा या कादंबरीत वाचायला मिळते. व्यावसायिक क्षेत्रात झालेली मैत्री, त्या वेळेस केलेले संकल्प, ठरवलेली ध्येये, त्यासाठी केलेला प्रवास या पुस्तकातून अनुभवायला मिळतो. हे सांगताना विशेष अभिमान वाटतो की, ‘सुधा मूर्ती या मराठीच लेखिका आहेत’ अशी ओळख आता सुधाताईंची महाराष्ट्रात आहे. सुधा मूर्ती आणि महाराष्ट्र हा एक विशेष जिव्हाळ्याचा ऋणानुबंधही या निमित्ताने पाहायला मिळतो.

सुधा मूर्ती यांचे बालपण महाराष्ट्रात आणि पर्यायाने सीमावर्ती मराठी बहुल भागात गेले. त्यांचे शालेय शिक्षण सुरुवातीच्या काळात मराठी माध्यमातून झाले. कर्मभूमी कर्नाटक असली, तरी सुधाताई महाराष्ट्राला मायभूमी मानतात. मराठी भाषेवर निरातिशय प्रेम करणाऱ्या सुधाताईंना जाहीर कार्यक्रमांतून वेळोवेळी मराठी भाषेतून संवाद साधताना पाहायला मिळाले आहे. सुधा मूर्ती यांची सर्व पुस्तके मराठी वाचकांपर्यंत पोहोचवताना सुधाताईंचे प्रकाशक आहोत, याचा सार्थ अभिमान आम्हांला नेहमीच वाटतो.

अखिल मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

Find us on: facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं


* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook **available on :**

amazon kindle | Get it on Apple Books | Google Play Books

## पुरस्कार

### डॉ. जयसिंगराव पवार यांना ‘सह्याद्री प्रतिष्ठान’चा ‘शिवराज्यभूषण पुरस्कार’ प्राप्त!

पुणे : यशवंतराव चव्हाण सेन्टरच्या वतीने ज्येष्ठ इतिहास-संशोधक डॉ. जयसिंराव पवार यांना २०२४चा ‘सह्याद्री प्रतिष्ठान’चा ‘शिवराज्यभूषण पुरस्कार’ नुकताच प्राप्त झाला आहे. दोन लाख रुपये रोख आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. माजी कृषिमंत्री पद्मविभूषण खासदार शरद पवार आणि कोल्हापूरचे खासदार शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते १८ जून, २०२५ रोजी प्रदान करण्यात आला. मेहता पब्लिशिंग हाऊस आणि डॉ. जयसिंगराव पवार यांच्यातील लागेबांधे फार जुने असल्याने, हा अभिमानाचा क्षण ‘याचि देही याचि डोळा’ बघण्याचं भाग्य मेहता पब्लिशिंग हाऊसलाही लाभलं. अवघ्या २३व्या वर्षापासून इतिहास-संशोधक म्हणून सुरू झालेली वाटचाल तीन दशकांचा काळ लोटला, तरी पुस्तकरूपातून आपल्यासमोर येत आहे. इतिहास विषयाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या पुस्तकांबरोबरच भारताच्या इतिहासाचा मागोवा घेणारे ‘इतिहासविषयक ग्रंथ’, ‘ऐतिहासिक चरित्र’, ‘संपादित साहित्य’, ‘संदर्भ ग्रंथ’, ‘व्यक्तिचित्रसंग्रह’, ‘संशोधनात्मक’ इत्यादी साहित्यप्रकार त्यांनी हाताळले आहेत. ‘भाई वैद्य स्मृती पुरस्कार’, भारती विद्यापीठातर्फे

'जीवनसाधना गौरव, २०२३ यांसारख्या प्रतिष्ठित पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. डॉ. जयसिंगराव पवार यांची मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे नवप्रकाशित झालेली 'मराठ्यांचा इतिहास : खंड १ – शिवशाही आणि खंड २ – पेशवाई' ही पुस्तके वाचकांच्या पसंतीस पडत आहेत. डॉ. जयसिंगराव पवार यांच्या लेखणीची किमया येणाऱ्या असंख्य पिढ्यांपर्यंत पोहोचत राहो, हीच सदिच्छा. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे डॉ. जयसिंगराव पवारांचे मन:पूर्वक अभिनंदन..!

## प्रदीप कोकरे यांना साहित्य अकादमी युवा साहित्य पुरस्कार २०२५ प्राप्त!

पुणे : साहित्य अकादमी युवा पुरस्कार २०२५- हा मानाचा पुरस्कार मराठी भाषेतील तरुण लेखक 'प्रदीप कोकरे' यांच्या 'खोल खोल दुष्काळ डोळे' या वास्तववादी कादंबरीस प्राप्त झाला आहे. 'सुशिक्षित बेरोजगारी – शैक्षणिक डिग्र्यांचा खच – नोकऱ्यांची कमतरता – रोजच्या भाजी-भाकरीचा प्रश्न आणि जीवनाला दिशा देण्यासाठी मुंबईसारख्या शहराचा घेतलेला आसरा... यात एक तरुण कसा जगतो त्याचं अचूक शब्दचित्रण या कादंबरीत आहे.' या पुरस्काराचा आनंद द्विगुणीत करताना, सर्व रसिक वाचकांना पुन्हा एकदा आठवण करून द्यावीशी वाटते की, 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे २०२४पासून 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार' देण्यास प्रारंभ झाला खरा आणि योगायोगाने प्रदीप कोकरे यांची हीच कादंबरी प्रथम पुरस्कार विजेती ठरली. साहित्य अकादमीच्या युवा पुरस्काराचा हा क्षण मेहता पब्लिशिंग हाऊससाठीही अभिमानाचा क्षण ठरलेला आहे. त्याबद्दल मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रदीप कोकरे यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

## डॉ. सुरेश सावंत यांना
## साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कार २०२५ प्राप्त!

पुणे : साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कार २०२५ हा मानाचा पुरस्कार मराठी भाषेतील बालसाहित्यकार, तसेच शिक्षणतज्ज्ञ म्हणून प्रख्यात असलेल्या डॉ. सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया' या काव्यसंग्रहास प्राप्त झाला आहे. सुप्रसिद्ध बालसाहित्यिक ल. म. कडू हे या काव्यसंग्रहाबद्दल व्यक्त होताना म्हणतात की, ''हे लेखन बालमनाचा वेध घेणारे आहे. निव्वळ उपदेशपर लेखनाने मुलांवर संस्कार होतातच असं नाही; तर त्यासाठी वेगळी वाट धरावी लागते. या काव्यसंग्रहातील 'वड आजोबा', 'मावळतीचा सूर्य', 'मित्रा', 'तेजशलाका', 'संकटाच्या छातीवर', 'दिवाळीची पणती' अशा कविता वाचल्यावर त्याची प्रचिती येते.'' मुलांचं भावविश्व जपणारं बालसाहित्य निर्माण होत राहणं ही आजच्या काळाची गरज आहे आणि याच जाणिवेनं लेखन करणारे सर्वांचे आवडते बालसाहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांचे मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

◆

# श्रद्धांजली


## पद्मश्री, अरण्यऋषी मारुती चितमपल्ली कालवश



पुणे : ज्येष्ठ वनाधिकारी, निसर्गप्रेमी, वन्यजीवांचे जाणकार म्हणून ख्यात असलेले – अरण्यऋषी या नावाने सर्वश्रुत असलेले, पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रतिभावान साहित्यिक मारुती चितमपल्ली वयाच्या ९३व्या वर्षी या महाकाय निसर्गात विलिन झाले. निसर्गसौंदर्य, वन्य प्राणिमात्रांचं जीवन, ग्रामीण संस्कृतीचं दर्शन, सृष्टीविषयक जाणीव व आस्था आणि त्या अबोल जीवांबद्दल सतत जाणवत राहणारी माणुसकी हे सर्व त्यांच्या लेखणीतून वाचकांच्या हृदयात या सृष्टीबद्दल एक वेगळं स्थान निर्माण करतं. लेखणीतील सहजता आणि लिखाणामागचा अनुभव यांचं एकत्र येणं प्राणिमात्रांवर प्रेम करणाऱ्यांना प्रेरणा देऊन जातं. मारुती चितमपल्ली हे 'रानवाटा' दाखवत 'निसर्गवाचन' करतात; तर 'घरट्या पलीकडे' जाऊन 'निळावंती' बघतात. अजून पुढे जात 'चैत्रपालवी' जगतात; तर 'चांदण चकवा' न्याहाळत 'रातवा' जागवतात. 'पाखरमाया' करत करत 'जंगलाचं देणं' फेडतात आणि 'नवेगावबांधचे दिवस' बघाण्यासाठी निसर्गाच्या कुशीत लुप्त होतात. अशा निसर्गप्रेमी मारुती चितमपल्ली यांस मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# कान्होजी आंग्रे

**मनोहर माळगांवकर**

अनुवाद

**पु. ल. देशपांडे**

*दर्यावर स्वार होणारे वीर कान्होजी आंग्रे यांच्या थरारक कारनाम्यांचा वेध घेणारी मनोहर माळगांकर लिखित आणि पु. ल. देशपांडे यांनी अनुवादित केलेली कादंबरी*

### ही भूमी

भूगोलाच्या दृष्टीने पाहिलं तर ही कथा कोकणापुरतीच मर्यादित आहे. कोकण : भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरची

एक चिंचोळी पट्टी. सखल किनारपट्टी दाखवायला नकाशावर सामान्यत: हिरव्या रंगात रंगवलेली. उत्तरेला वसईपासून सुरू होऊन दक्षिणेला कारवारला संपणारी एक निमुळती खडबडीत किनारपट्टी. चारशे मैल लांबीची; पण रुंदीला मात्र चाळीस मैलांपेक्षा क्वचितच मोठी असलेली. एखाद्या सापाने मोठ्या आकाराचा बेडूक गिळताक्षणी गळ्याशी फुगल्यासारखी. मुंबई शहर आत घेताना तिथे काहीशी फुगलेली.

भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने मात्र कोकणभूमीची उत्पत्ती अलीकडची. शास्त्रज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे, ही भूमी ज्वालामुखीच्या उत्पातात समुद्राच्या तळापासून वर उडवली गेलेली. आणि हिंदू शास्त्री मंडळींच्या प्रतिपादनाप्रमाणे सांगायचं झालं तर, लोभी ब्राह्मणांना सारी पृथ्वी दान दिल्यावर आपल्याला स्वत:ला राहायला कुठेही जागा उरलेली नाही हे पाहून परशुरामानी समुद्र शंभर योजनं मागे हटवून निर्माण केलेली. कोणाचं का म्हणणं बरोबर असेना; पण ज्याला फारसा प्राचीन म्हणता येणार नाही अशा कालात समुद्राच्या भरती-ओहोटीच्या लाटांनी खोदलेल्या जोडरेषा जिथून गरुड पक्षी उंच भराऱ्या मारतात अशा कडेकपाऱ्यावर आपल्याला आजही पाहायला मिळतात. एक खडकाळ, कुणाला फारशी जवळ येऊ न देणारी किनारपट्टी. तिच्यावर, काळ्याशार दुर्गम दुर्गाचं संरक्षण असलेली काही नैसर्गिक बंदरं. ठिसूळ खडक, लाल मुरूम आणि फुटक्या शंखशिंपल्यांच्या चुन्याचं मिश्रण असलेली माती. दाट लोकवस्तीच्या पोटापाण्याची सोय करायला सर्वस्वी असमर्थ, तरीसुद्धा सारा भूभाग आश्चर्य वाटावं इतका हिरवागार, तिथे काजू आणि फणसाची झाडं मुक्तपणाने डोंगरात वाढतात आणि अविश्रान्त वाहणारे तिथले खारे वारे जगातल्या उत्कृष्ट आंब्यांची पैदास करायला मदत करतात. गोगँच्या निसर्गचित्रांच्या धर्तीचा माडांची झालर असलेला समुद्रफलक. त्यातल्या हिरव्याला उठाव देणारे लालभडक आणि पिवळेजर्द रंग. जास्वंद, मोहाची फुलं, गुलमोहर, सावरीची झाडं, पोफळीसारख्याच सडसडीत डौलदार स्त्रियांची ही भूमी. इथले पुरुषही काटक, चपळ, रेसच्या घोड्यांवरच्या जॉकीच्या चणीचे. गाण्याचे आणि पिण्याचे शौकीन. शीघ्रकोपी आणि भावनाप्रधान. समुद्राचं आणि किनारपट्टीचं संतान. भुईवर आणि पाण्यावर सारख्याच सहजतेनी वावरणारं.

पश्चिमेला अरबी समुद्र पसरलेला. पूर्वेला पश्चिम घाट किंवा नुसतेच

घाट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केवळ पर्वतांच्या भिंतींनी सपाट जमीन एकदम तोडलेली. क्षणभरही ही जमीन किंवा ते डोंगर आपला दावा सोडायला तयार नसल्यामुळे त्या तंट्यातल्या ओढाताणीतून अवघड चढणीच्या सुळक्यांसारख्या शिखरांची माळच्या माळ तयार झालेली. ज्या काळी माणसांना डोंगरमाथ्यावरच आपण सुरक्षित आहोत असं वाटायचं, त्या काळी एकापाठी एक येणाऱ्या आक्रमकांनी पहारे आणि टेहळणी बुरुजांचे त्या डोंगरांच्या माथ्यावर मुकुट चढवलेले.

ही भूमी - हे कोकण. हा दख्खनचाच एक भाग. हिंदुस्थानच्या द्वीपकल्पाच्या भूखंडाच्या पश्चिमेच्या या भागाला त्या काळी 'दख्खन' म्हणायचे. दख्खन ही मराठ्यांची भूमी.

तो एक धामधुमीचा काळ होता. साथीच्या रोगासारख्या लढाया चालायच्या. कोकणात मात्र वर्षातले चार महिने लढाया होऊच शकत नसत. जूनच्या आरंभाला एल्गाराचा इशारा देत वारा चढाई करायचा. आणि विजेची शेवटली टाळी नैर्ऋत्येच्या मोसमी वाऱ्याची वार्ता द्यायची. तोपर्यंत पर्जन्यदेव वरुणासाठी शेतीची मशागत झालेली असायची. मुलूखगिऱ्या मधल्या टप्प्यावरच थोपविल्या जायच्या. वेढे उठवले जायचे. आणि जहाजं कोरड्या जमिनीवर ओढून आणली जायची. त्यांची धुडं कुजून जाऊ नयेत म्हणून तेलपाणी केलं जायचं. जुलैपर्यंत वाऱ्यापावसानी संपूर्ण विजय मिळवलेला असायचा. गवताच्या गंजीच्या आकाराच्या खडकांना लाटा धडका द्यायच्या आणि पाऊस निर्दय फटकाऱ्यांनी डोंगरकड्यांना झोडपून काढायचा. कोकणातल्या शेकडो नद्या ते वारा-पाणी पिऊन उन्मत्तपणानी फुगून गरजणाऱ्या दैत्यांसारख्या उघड्यावरच्या जनावरांना मारून टाकायच्या आणि माणसांच्या मनांची उभारी नाहीशी करून टाकायच्या. राजे आणि रयत, आक्रमक आणि आक्रमित, उंच भिंतीच्या आडोशाला जायचे, थंडीत कुडकुडायचे आणि वेढा उठवण्यासाठी पर्जन्यदेवाला नवसाचा नैवेद्य अर्पण करायचे.

## इथला माणूस

''मराठा तेतुका मेळवावा''

जवळजवळ चारशे वर्षं दख्खनवर मुसलमान राजांचं राज्य होतं. इथले

लोकही परक्या धन्यांची चाकरी करण्यात समाधान मानीत होते. नंतर समर्थ रामदासांनी ‘मराठा तेतुका मेळवावा’ अशी स्वातंत्र्याची साद घातली होती. त्या आधीच शिवाजी महाराजांनी लोकांचं नेतृत्व करून विजापूरच्या सुलतानाचा दख्खनेतला बराचसा टापू जिंकून घेतला होता. नवं राज्य आणि नवं राजघराणं स्थापन केलं होतं. तात्पर्य, ही कथा घडण्याच्या काळात मराठ्यांनी बऱ्याच काळानंतर दख्खनच्या बऱ्याचशा मोठ्या प्रदेशावर राज्य करायलाही सुरुवात केली होती.

तिथे दूर आग्र्याला, त्या काळी ज्ञात असलेल्या पृथ्वीच्या एकपंचमांश भागाचे मोगल हे सम्राट असले, तरी ते दख्खनचे स्वामी मात्र कधीही नव्हते. मोगलांच्या गादीवर औरंगजेब होता. बाबराने स्थापन केलेल्या त्या बलाढ्य राजघराण्यातला हा सहावा तख्तनशीन वारसदार होता आणि दैवयोगानी अखेरचा बडा मोगल ठरणार होता. विद्वान होता. सभोवती अफाट ऐश्वर्य असूनही एखाद्या तापसासारखा राहत होता. आपल्या आयुष्याची अखेरची वर्षं दख्खनमधली मराठ्यांची नवी राजसत्ता पुरी उद्‌ध्वस्त करायचा ध्यास घेतलेला धर्मांध होता.

पुढे दीर्घकाळ चाललेल्या मोगल आणि मराठ्यांच्या कडव्या लढायांची सुरुवात झालेली होती. त्यामागे धर्मवेडाचे मुसलमान विरुद्ध हिंदू हे बुलंद सूर वाहत होते. बनारसच्या काशीविश्वेश्वराचं परमपवित्र मंदिर उद्‌ध्वस्त करून औरंगजेबाने हिंदू मनामनाला प्रचंड हादरा दिला होता. त्याला शरण जाणं हे केवळ एका मुसलमान राजाच्या ऐवजी दुसऱ्याकडे जाणं एवढंच नव्हतं. त्यात आपला धर्म सोडण्याचाही अंतर्भाव होता. किंवा पर्याय म्हणून भयंकर जिझिया कर भरावा लागत होता. हा कर सगळ्या बिगरमुसलमानांना भरायला लागायचा. औरंगजेबाची मोहीम जसजशी दख्खनच्या उत्तर भागातल्या काळ्याभोर कापूसपट्ट्यात खोल-खोल रुतायला लागली, तसतसा हा जिझिया कर एखाद्या राक्षसासारखा जास्त- जास्त फुगायला लागला. आणि शेवटी सर्व बिगरमुसलमानांना आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्के कर भरायची पाळी आली.

मराठ्यांनी स्वातंत्र्याची चव घेतली होती. आणि स्वातंत्र्याला दुसरा पर्याय नाही हे त्यांनी जाणले होते. एकमुखाने ते प्रतिकाराला उभे राहिले. त्यांच्या त्या सर्वशक्तीनिशी झुंजण्याच्या निर्धाराने आक्रमक थक्क होऊन

गेले; कारण मराठे हा लढा स्वत:ला पवित्र वाटणारं प्रत्येक मूल्य टिकवण्यासाठी देत होते. इथे काठाशी राहून इंग्रज, पोर्तुगीज आणि डच या युरोपीय शक्ती या बलाढ्यांची झुंज ससाण्याच्या नजरेने न्याहाळीत होत्या. त्याबरोबर केवळ युद्धाच्या पर्वणीतच व्यापारात साधता येणारा भरमसाट नफाही पदरात पाडून घेत होत्या.

अजूनही इथे आपलं बस्तान बसेल याची खात्री न पटलेले इंग्रज भारतात आपले डळमळते पाय रोवायच्या खटपटीत होते. मोगलांशी आणि मराठ्यांशी आदबीने वागत होते. दोघांनाही योग्य सावधगिरी राखून सारख्याच सहजतेने नजराणे पोहोचवीत होते, आणि खुशामत करीत होते. हे सर्व सावधगिरीनं चाललं होतं हे खरं; पण त्याबरोबर इंग्रजच ते, त्यामुळे मोक्याची संधी साधण्यावर डोळाही ठेवून होते.

इंग्रजांहूनही अधिक आक्रमक, स्वत:विषयी फाजील आत्मविश्वास असलेले आणि मोगल किंवा मराठे यांच्यापैकी कुणालाही न जुमानता त्यांपैकी कुणाच्याही बाजूने उभे राहायला सज्ज होते, ते म्हणजे पोर्तुगीज. दोनशे वर्षांआधीच त्यांचा हिंदुस्थानात शिरकाव झाला होता, आणि हिंदुस्थानातल्या सगळ्या राजकीय सत्ताधाऱ्यांनी त्यांची समुद्रावरची अबाधित सत्ता निमूटपणाने मान्य केली होती. साऱ्या हिंदुस्थानात पोर्तुगीजांची सत्ता ही इतर युरोपियनांपेक्षा अधिक बलाढ्य होती. मोगल स्वत:ला जमिनीवर अंमल गाजवणारे मानीत तर पोर्तुगीज समुद्रावर सारा अंमल आपला आहे असं मानीत. त्यांचा तो अंमल ओसरत चालल्याचा, इतरांची गोष्ट दूरच राहो; पण खुद्द पोर्तुगीजांनाच तोवर पत्ता लागला नव्हता.

डचांचाही मुक्काम होता; पण ब्रिटिशांच्या दडपणामुळे ते हळूहळू काढता पाय घेऊ लागले होते. त्यांनी आपलं लक्ष दुसरीकडे साम्राज्य स्थापन करण्याकडे गुंतवलं होतं. स्वत:च्या ताब्यातून निसटत चाललेल्या हिंदुस्थानातल्या लहानसहान तुकड्यांना लटकून राहण्याचा त्यानंतरही सुमारे शंभर वर्षं ते प्रयत्न करीत होते; पण त्यांच्या मोठ्या वसाहती हिंदुस्थानात इतर ठिकाणी होत्या. खुद्द कोकणात डचांचं अस्तित्व फारसं जाणवत नव्हतं.

या युरोपीय शक्तींपैकी कुणाचंही एकमेकांशी पटत नव्हतं. विशेषत:, ब्रिटिश आणि पोर्तुगीज यांच्यात तर सतत तणाव आणि कटुता असायची.

तिकडे पश्चिमेला त्यांच्या मायदेशात त्यांची आपसात नेहमी युद्धं चालायची, आणि इकडे पूर्वेत तर ते मायभूमीपासून दूर आलेल्या लोकांत जो एक तीव्र कडवेपणा असतो तो मनात ठेवून एकमेकांशी भांडायचे. प्रतिस्पर्ध्यावर कोसळणाऱ्या संकटात खुशी मानायचे आणि एकमेकांच्या विजयांनी त्यांचा जळफळाट व्हायचा.

इतकं असूनही अठराव्या शतकाच्या सुरुवातीला या परदेशी रक्तपिपासूंना कोकण किनाऱ्यावरचा सर्वमान्य शत्रू निवडायला सांगितलं असतं, तर त्यांतल्या कुणीही मोगल किंवा मराठ्यांचं नाव घेतलं नसतं. ते एकमुखाने म्हणाले असते : कान्होजी आंग्रे.

ज्याला हे ब्रिटिश लोक 'चांचा' म्हणत होते, अशा या माणसाला वठणीवर आणायला याच ब्रिटिशांना, आजच्या दराने हिशोब केला, तर दरवर्षी दोन कोटी रुपये खर्च करावे लागत होते. त्याच्यापासून स्वत:चा बचाव करायला मुंबई शहराभोवती त्यांनी एक खंदक खणला होता, आणि मग त्या खंदकापलीकडे एक भिंत बांधली होती. त्याला नेस्तनाबूत करण्यासाठी पोर्तुगीजांसारख्या स्वत:च्या कडव्या शत्रूशीही त्यांनी हातमिळवणी केली होती.

पोर्तुगीजांनी त्याच्याशी कधी दोस्ती जमवली तर कधी लढायाही केल्या; पण हे चालू असताना गुप्तपणाने त्याच्याविरुद्ध कारस्थानं रचली, आणि त्याच्या शत्रूंना मदत केली. डचांनी एकदाच काय तो त्याच्या अनेक किल्ल्यांपैकी एका किल्ल्यावर हल्ला केला होता आणि त्यांच्या कल्पनेतही नव्हती इतकी स्वत:ची माणसं गमावून बसले होते. मग त्यांनी थेट बटेव्हियाहून एक युद्धनौकांची तुकडी आणून त्याला वठणीवर आणायचे प्रयत्न करून पाहिले; पण तेवढ्यातच धूर्तपणाने त्याच्यापासून चार हात दूर राहण्यासाठी त्यांनी त्याच्या पाण्यातून काढता पाय घेतला.

इंग्रज त्याला जमिनीवरचं आणि पाण्यातलं जे मिळेल ते गिळंकृत करणारा 'लॅण्डशार्क' म्हणायचे. त्यांनी त्याला लुटारू, चांचा, खलपुरुष, बंडखोर सगळं काही म्हणून घेतलं आणि आपल्या वकिलांना त्याच्या दारी तिष्ठत राहायला पाठवताना मात्र, 'त्याच्याशी सभ्यपणाने बोलावे' अशा सूचनाही दिल्या. त्याला भरमसाट नजराणे देऊन विकत घेऊन टाकण्याचेही प्रयत्न केले. पोर्तुगीजांनी तर त्याला त्याहूनही गलिच्छ शिव्या दिल्या. तरीही

त्याची बार्बारोसाशी तुलना करून त्याला मौल्यवान भेटीही पाठवल्या.

कोकण किनाऱ्यालगतच्या दर्यावरून कुठलंही जहाज एकटंदुकटं, निर्धोक जाऊ शकत नव्हतं. युद्धनौकांचीदेखील शाश्वती नव्हती. त्या तांड्यातांड्याने जायच्या. शस्त्रास्त्रांचा कडेकोट बंदोबस्त असायचा. आपली जहाजं सुखरूपपणे बंदरात आणून पोहोचवणाऱ्या युद्धनौकांच्या कप्तानांना व्यापारी लोकांनी पाचशे मोहोरांची थैली बहाल करण्याची वहिवाटही सुरू केली होती. ही वहिवाट आंग्र्यांचा पाडाव झाल्यानंतरही चालू होती. जमिनीवर कुणाचीही सत्ता असो, खंदक आणि भिंतीच्या कडेकोट बंदोबस्ताआड असणाऱ्या व्यापारी वसाहतीवर कोणाचीही मालकी असो; पण अठराव्या शतकाच्या सुरुवातीला कोकणच्या पाण्यावर सत्ता कोणाची होती यावर मात्र दुमत नव्हतं.

सत्ता होती ती कान्होजी आंग्रे यांचीच!

## एका लोककथेवरची कोळिष्टकं

कान्होजी आंग्र्यांच्या आयुष्याच्या सुरुवातीच्या काळाबद्दल इतकी थोडी माहिती उपलब्ध आहे, की त्यांच्या चरित्राला एका लोककथेपासूनच सुरुवात करायला हवी. आणि आश्चर्य असं आहे की, ही लोककथा कोकणात अद्यापही सांगितली जाते आणि अंदाजे दोनशे वर्षांपूर्वीच्या जुन्या, पिवळ्या कागदाच्या भेंडोळ्यात अजूनही ती शाबूत राहिलेली आहे.

त्या कथेवरून असं दिसतं की, कान्होजीचं बालपण हर्णेला जोशी नावाच्या ब्राह्मणाच्या घरी गुराखीपणात गेलं. एकदा गुरं राखायला गेलेला दहा वर्षांचा कान्होजी एका झाडाखाली झोपी गेला. जेव्हा तो ब्राह्मण कान्होजीच्या शोधार्थ निघाला, तेव्हा त्याने पाहिलं की कान्होजी निजला आहे आणि पाच फण्यांच्या नागाने फणा काढून त्याच्यावर छाया धरली आहे. हे पाहून मनात भयभीत होऊन ब्राह्मणाच्या हातातली काठी पडली. त्या आवाजाने सर्प निघून गेला.

*जोसी याणी मनात विचार केला की कानोजीस सापाने मारिले तेव्हा कष्टी होऊन निजला होता त्याजपासी गेला; पाहिले तो जिवंत आहे. तेव्हा*

*त्यास उठवून विचारले की, तू जेवावयास येतोस. आज का आला नाहीस? तेव्हा त्याणें सांगितले की मी येथे छायेस बसलो तशीच निद्रा लागली. घरी यावयाचा सुमार राहिला नाही.*

पाच फण्यांच्या एका नागाने मध्यान्हीचं ऊन लागू नये म्हणून कान्होजीच्या डोक्यावर सावली धरली होती. यावरून त्या ब्राह्मणाची त्या क्षणी खात्री पटली की कान्होजीच्या नशिबात पुढे राजयोग आहे.

घरी आल्यावर ब्राह्मणानी कान्होजीच्या कुंडलीशी आणि संहितेशी आपला अंदाज पडताळून पाहिला. ग्रहयोगही सांगत होते की हा मुलगा राजाच होणार.

आणि पुढे ही लोककथा सांगते की, त्यानंतर ब्राह्मणांनी कान्होजीला त्याच्या त्या स्थानाला भावीकाळात उपयुक्त ठरेल असंच शिक्षण द्यायला सुरुवात केली.

भारतीय लोककथांची पाने अतिशय भयंकर सापांनी भरलेली आहेत आणि नियतीने ज्यांना थोरपणा मिळवून द्यायचं ठरवलेलं असतं, अशा माणसावर तो झोपलेला असताना सापांनी आपली फणा उभारून त्याच्या डोक्यावर सावली धरणं यात मुलखावेगळं असं काही नाही. झोपेच्या वेळी पुराणातल्या कथांच्या खुराकावर पोसलेलं कुठलंही हिंदू पोर एकाहून अधिक फणा असणाऱ्या सापाच्या दर्शनानी उगीच गडबडून जायचं नाही. एवढंच कशाला, पुराणं तर असल्या अनेक फण्यांच्या सापांच्या कथांनी भरलेली आहेत. ही पृथ्वीच मुळी एका प्रचंड सागरी सर्पाच्या हजार फण्यांवर तग धरून असल्याचं सांगितलंय, तिथे इतर सर्पांचं काय?

हा मुलगा पुढे राजा होणार असल्याचे ग्रहयोग ज्या कुंडलीत त्या विद्वान ब्राह्मणानी पाहिले होते, ती आपल्या शिष्याची कुंडली जर त्यानी जपून ठेवली असती, तर निदान कान्होजीची जन्मतारीख कळायला तरी उपयोगी पडली असती; पण तसा काही पुरावा हाती लागत नाही. इतिहासकारांनी जे अनुमान काढलंय, त्याच्यावर भिस्त ठेवणं हेच जास्तीतजास्त शक्य आहे. कान्होजीचा जन्म त्यांच्या मते इ. स. १६६९च्या सुमाराला झाला.

पण लहानपणीच कान्होजीला हर्णेला ब्राह्मणाकडे शिकायला पाठवला होता हे मात्र शक्य आहे. त्या काळी अगदी मामुली शिक्षण देण्यापलीकडे जाणाऱ्या शाळा नव्हत्या, आणि सुखवस्तू क्षत्रिय कुटुंबात आपल्या मुलाला

ब्राह्मण गुरूंकडे शिकायला पाठवायची सर्वमान्य प्रथा होती. 'ज्ञान' हा ब्राह्मणवर्गाचा खास अधिकार होता. त्यांच्याकडून विद्या घ्यायला त्यांच्या घरी राहावं लागे. हलकीसलकी कामंदेखील करावी लागत. आणि शिष्याची नम्रता आणि गुरुभक्तीची पात्रता यावर ज्ञानाची देवघेव अवलंबून असायची.

कान्होजीच्या बालपणी लढवय्या मराठा समाज बहुतांशी निरक्षर होता. शिवाजी महाराजांनासुद्धा लिहिता-वाचता येत नव्हतं, असं काही इतिहासकारांचं आग्रहाचं म्हणणं होतं; पण ते आता खोटं ठरलं आहे. शिवाजी महाराजांच्या हातची बरीच पत्रं अलीकडे सापडली आहेत. क्षत्रियांच्यात आता धर्मग्रंथांची नसली, तरी भाषेची आणि विज्ञानाची गोडी नव्याने उत्पन्न व्हायला लागली होती. लढाईचा मोसम आला की लढाईत गुंतायचं आणि त्या मोसमाला सुकाळ मानायचा असा परिपाठ असलेल्या जमान्यात कान्होजीचा बाप तुकोजी हा एक भटक्या आणि कुठेही घर नसलेला शिपाईगडी असला, तरी त्यांनी आपल्या मुलाला हर्णेसारख्या गावातल्या ब्राह्मणाकडे शिकायला ठेवणं अशक्य नव्हतं. सतत चालणाऱ्या लढायांमुळे उद्ध्वस्त झालेल्या कोकणात सुवर्णगडाजवळ किनारपट्टीवर वसलेलं हर्णेसारखं खेडं हे शिवाजी महाराजांच्या कुठल्याही किल्ल्यापेक्षा सुरक्षित असावं.

पाच फण्यांच्या नागाची दंतकथा लिहिलेल्या त्या कागदावरच्या मजकुरात पुढे म्हटलंय-

*''तेव्हा जोसी याणी पंचांग काढून पाहिले की यास छत्र सिंहासन प्राप्त होईल. असे तेव्हा जोसी यानी मनात फारच संतोषी होऊन कानोजीस विचारिले की तुजला राज्यदौलत प्राप्त जाली असता मजला काय देसील तेव्हा कानोजी बोलिला की मी तर तुझा चाकर, राज्य कशाने प्राप्त होईल, तुम्ही माझी थटा करिता. तेव्हा जोसी बोलिला की तुझे दैवाने मिळाले तर मला काय देसील नंतर कानोजी बोलिला की दैवाने प्राप्त जाले असता तुम्ही जे मागाल ते देईन यावर जोशाने आपण सध्या मालकासाठी कसत असलेले शेत आणि भोवतालची राई मागितली.''*

''ती तुमची होईल!'' असं कान्होजीनी त्याला वचन दिलं. *''तेव्हा गुरे दुसरे गोवारियाचे स्वाधीन करून कानोजीचा हात धरून घरी आणिला ते दिवसापासून गोवारीपणा सोडवून चांगला पोषाक देवून आपले ममतेत ठेविला. तेव्हा कानोजीस हात्येरांचा शोक पुरा जाहला चांगल्या तलवारी*

*जमा करू लागला असे जोसी याणी पाहून मनात म्हणाला की ही राज्यचिन्हे आहेत. त्याजवर कित्येक दिवसांनी चाकरीची उमेद धरून जोसी यास विचारिले की किले सुवर्णदुर्गास जाऊन सुभेदार याजवळ चाकरीस राहातो.''*

असा काही संवाद झाला असला-नसला, तरी वीसएक वर्षांनंतर कान्होजी जेव्हा मराठा राजांचा दर्यासारंग आणि कोकणचा अनभिषिक्त राजा झाला, त्या वेळी त्याला आपल्या गुरूचं प्रेमळ आणि आदरयुक्त स्मरण झालं असणार आणि त्यानी त्याला ते शेत आणि राई अर्पण केली असणार, असं मात्र धरून चालायला हवं. लोककथेत त्यांनी तसं केल्याचा उल्लेख आहे. या लोककथा इतिहासापेक्षाही मनाला अधिक समाधान देणाऱ्या असतात.

हर्णेच्या त्या अनामिक ब्राह्मणाने आपलं काम मात्र चोख बजावलं असावं; कारण त्या काळातला सर्वश्रेष्ठ भारतीय दर्यासारंग असा हा त्याचा शिष्य विलक्षण ज्ञानसंपन्न होता आणि आजचेही विद्वान ब्राह्मण म्हणून दाखवतात, त्याप्रमाणे शास्त्रातले आणि तत्त्वज्ञानविषयक धर्मग्रंथातले संस्कृत उतारे धडाधड म्हणून दाखवण्याची त्याला मोठी हौस होती. त्यांचं आंग्रे हे नाव पुण्याजवळच्या आंगरवाडीवरून पडलं. घराण्याचं मूळ नाव संकपाळ. कान्होजींच्या आधीचे आंग्रे, 'संकपाळ' म्हणून ओळखले जायचे.

अशा कुठल्या कौटुंबिक परिस्थितीमुळे, कुठल्या तुफानामुळे, कुठल्या दैवयोगाने किंवा कुठल्या युद्धाच्या आकस्मिक धामधुमीमुळे हे कुटुंब दख्खनच्या घाटावरच्या कोरड्या ओसाडीतून अरबी समुद्राच्या मांडीवर फेकलं गेलं, ही गोष्ट कुठलीही दंतकथा किंवा कुठलाही इतिहास उलगडून दाखवीत नाही. समुद्रावरच्या आंग्र्यांचा पहिला उल्लेख १६४० साली झालेला सापडतो; पण त्यांना त्या काळी कुणी 'आंग्रे' म्हणत नव्हते. त्या साली पोर्तुगीज आणि विजापूरचा बादशहा यांच्यात चौलपाशी झालेल्या नाविक युद्धात कान्होजीचा बाप आणि सेखोजी संकपाळाचा मुलगा, तुकोजी याने फार मोठा पराक्रम गाजवला असं म्हटलं आहे. विजापूरच्या तुकडीचं नेतृत्व शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे यांनी केलं होतं. चौलच्या लढाईत पोर्तुगीज सैन्याचा पराभव झाला आणि उत्तर कोकण; म्हणजे चौल ते मुंबईपर्यंतची किनारपट्टी विजापूरच्या राजांच्या अमलाखाली आली.

तुकोजी संकपाळ शहाजीच्या चाकरीत असला, तरी तोपर्यंत तो विजापूरच्या सुलतानाच्या चाकरीत नसावा असं वाटतं. यात आश्चर्य करण्यासारखं

काहीच नाही. साथीच्या रोगासारख्या लढाया व्हायच्या अशा त्या काळात स्वत:च्या नजीकच्या वरिष्ठापलीकडे निष्ठा बाळगायची गरज नसायची. लष्करची चाकरी आपखुशीनी केली जायची आणि बहुधा ती पूर्णपणे धंदेवाईक रीतीने व्हायची. आपला धनी कोण आणि शत्रू कोण याची फिकीर करण्याचं कारण नसायचं. त्या चाकरीमुळे सैन्यातल्या प्रत्येक सैनिकाला आपला सरसेनापती किंवा राजा यांच्याशी इमानदारीचा दुवा जुळवायची सक्ती होत नव्हती. चौलच्या लढाईनंतर लवकरच तुकोजीने शहाजीच्या सैन्यातली नोकरी सोडली. त्यानंतर वीस वर्षांनी त्याच्या एकेकाळच्या मालकाचा मुलगा शिवाजी याने त्याला पंचवीस शिपायांच्या तुकडीचा सरदार करीपर्यंत त्याचं नावही कुठे ऐकिवात नव्हतं.

## मराठी नौदलाची सुरुवात

‘आरमार हे राज्यांगच आहे. ज्याचेजवळ आरमार त्याचा समुद्र.’
– रामचंद्रपंत अमात्य

६ जून १६७४. ब्राह्मणांनी शुभ म्हणून वर्तवलेल्या मुहूर्तावर रायगडावर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. इतिहासात पहिल्याप्रथमच मराठ्यांच्या भूमीवर मराठी राजा सत्तेवर आला. त्यापूर्वीचा शेवटला हिंदू राजा कोण हे कुणालाही आठवत नव्हतं. त्यानी कुठे आणि कधी राज्य केलं याचाही पत्ता नव्हता. त्या दिवशी त्याबद्दल कोणी फिकीरही केली नाही. राज्याभिषेकाच्या वेळी जी घोषणा केली गेली, त्यात शिवाजी महाराजांचं राज्य ‘समुद्रापार’ पसरल्याचं वर्णन होतं.

रायगडावर त्या समारंभाला जे आले होते त्यात मि. हेन्री ऑक्झिंडन हा इंग्रज सुरतेच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या अध्यक्षांनी पाठवलेल्या राजदूतावासाचं नेतृत्व करीत होता, असं वर्णन करण्यात आलं आहे. मिस्टर ऑक्झिंडननी शिवाजी महाराजांना नजराणा म्हणून डझनभर शाली आणि एक हिऱ्याची अंगठी आणली होती. एक तह पुरा करण्यासाठी म्हणून हा गृहस्थ रायगडावर तीन महिने मुक्काम करून होता. कंपनीला काही अधिक व्यापारी सवलती

हव्या होत्या. अबकारी करात सूट हवी होती आणि कोकण किनाऱ्यावर त्यांच्या मालाची मोडतोड करण्यात आली होती, त्याची भरपाई हवी होती.

जेम्स डग्लस म्हणतो, 'आमच्या स्वत:च्या राज्यातदेखील जे आम्हाला मिळणं दुरापास्त होतं त्याची आम्ही मागणी करीत होतो.' पण, मिस्टर ऑक्झिंडन मात्र रायगडावरचा त्या मान्सूनपूर्व काळातला भयंकर उकाडा आणि त्यानंतरचा पावसाळ्यातला सुरुवातीचा तो मुसळधार पाऊस यांना न जुमानता रायगडावर चिकाटीने तळ ठोकून होता. त्याच्या राजदूतावासात रोज इतकं मटण फस्त केलं जायचं, की त्याच्या मुसलमान खाटकालादेखील धास्ती वाटायला लागली; पण शेवटी ऑक्झिंडनने आपल्याला हव्या असलेल्या सवलती पदरात पाडून घेतल्या.

या राज्यारोहणाच्या वेळी झालेल्या घोषणेतला समुद्रावरच्या प्रभुत्वाचा उल्लेख ऐकून मिस्टर ऑक्झिंडनच्या मनाला बराच ताप झालेला असणार. त्यापूर्वी हिंदुस्थानातल्या दुसऱ्या कुठल्याही राजानी समुद्राकडे लक्ष दिलेलं नव्हतं; मात्र शिवाजी महाराजांचा हा दावा म्हणजे काही नुसतीच कल्पनेची भरारी नव्हती. आपलं राज्य स्थापन करायला त्यांनी जी चौदा वर्षं झुंज दिली होती त्या काळात त्यांनी एक अभेद्य आरमारही उभारलं होतं. असं म्हणतात की त्यांचं पहिलं प्रेम जडलं होतं ते समुद्रावर; कारण त्यांनी आपल्या तारुण्याचा काळ मुंबईजवळच्या महाडमध्ये घालवला होता.

गोव्यातल्या पोर्तुगीजांनी शिवाजी महाराजांच्या आरमाराचं वाढतं सामर्थ्य ओळखून त्यांच्याशी मैत्रीचा करार केला होता. त्यांच्या व्हाइसरॉयनी आपल्या प्रतिनिधीबरोबर नजराणे पाठवले होते आणि आपल्या जहाजांची नासधूस करणार नाही या अटीवर योग्य दरात तोफांचा पुरवठा करण्याचंही वचन दिलं होतं.

राज्याभिषेकाच्या काळात शिवाजी महाराजांपाशी छोट्या होड्या वगळून ५७ मोठ्या युद्धनौका होत्या. आणि पाच हजार नौसैनिकांचं बळ होतं. पाच वर्षांनंतर एकूण ६६ युद्धनौका होत्या. नऊ वर्षांआधी जेव्हा त्यांनी कारवार-अंकोल्यावर सागरी मोहीम केली, तेव्हा त्यांच्याजवळ निरनिराळ्या जातींची प्रत्येकी ३० ते १५० टनांची ८५ गलबतं होती आणि तीन शिडांची तीन गुराबं होती. चार हजार लढाऊ नौसैनिक होते. आजच्या मानाने पाहिलं, तरीही अभेद्य असं हे सामर्थ्य होतं.

ही कारवारची मोहीम दोन कारणांसाठी लक्षात घेण्यासारखी आहे. या मोहिमेत लढाई झाली नाही आणि दुसरं म्हणजे लहान-मोठ्या सर्व प्रकारच्या नाविक मोहिमांतली ही एकमेव मोहीम, की ज्याचं नेतृत्व स्वत: शिवाजी महाराजांनी जातीनं केलं होतं. असं म्हणतात की, शिवाजी महाराजांचं जहाज अनपेक्षित रीतीने आलेल्या गैरमोसमी तुफानामुळे इष्ट मार्गापासून दूर फेकलं गेलं. हा देवाने दिलेला धोक्याचा इशारा आहे असं त्यांनी मानलं. ते स्वत: कुशल दर्यावर्दी नव्हते आणि त्यांना जहाज लागून भयंकर त्रास भोगावा लागला असंही म्हणतात. कारवारच्या मोहिमेचा मुख्य उद्देश प्रांत जिंकणं किंवा लुटालूट करणं हा नक्कीच नव्हता. आणि पोर्तुगीजांच्या किनाऱ्यापासून ही मोहीम सावधपणाने दूरच राहिली. शिवाजी महाराजांचं आरमार उभारल्याला अवघी पाच वर्षं झाली होती आणि ते शून्यातून आकाराला आलं होतं. ही एक चाचणीची सफर होती. ती जहाजं, त्यावरचे अधिकारी आणि माणसं यांची, हल्ली जशी नव्यानी बांधलेल्या जहाजांची तालीम होते, तशी ही एक प्रकारची तालीम होती.

पुन्हा एकदा १६७० साली हे आरमार 'निशाण फडकवण्यासाठी' बाहेर पडलं आणि मुंबईतल्या इंग्रजांची झोप उडवून गेलं. शिवाजी सुरतेवर जोड आघाडी उघडून चढाई करणार याची त्यांना खात्रीच वाटत होती. मुंबईवरून हे आरमार पुढे गेलं. त्याची प्रत्येक हालचाल इंग्रज श्वास रोखून टेहळत होता; पण एकही गोळी न उडवता या आरमारानी मोहरा फिरवला. तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की, ही एक रंगीत तालीम आणि निशाण फडकवण्याची किनारी सफर आहे. शिवाजी महाराजांची लष्करी प्रतिभा त्या काळात ठाऊक असलेल्या डावपेचांच्या फार पुढे होती.

किनाऱ्याच्या संरक्षणाची जाणीव असणाऱ्या तत्कालीन हिंदुस्थानात शिवाजी हा एकमेव राजा होता हे निर्विवाद आहे. हळूहळू वाढत्या संख्येनी शिवाजी महाराजांच्या जहाजांनी किनाऱ्यावर गस्त घालायला सुरुवात केली. ''पोर्तुगीजांना, डचांना, सिद्दीला, इंग्रजांना आणि सत्तावीस विरोधी शक्तींना त्यांनी जुमानलं नाही. या साऱ्या शक्ती किनाऱ्यावरच्या प्रजेकडून नजराणे उकळत. आपापल्या राजासाठी धान्य, सोनं आणि इतर खंडणी वसूल करीत. खुल्या समुद्रावर ही एक प्रकारची बलाढ्य लष्करी सत्ताच नांदत होती.''

आरमाराच्या प्रगतीबरोबरच शिवाजी महाराजांनी किनाऱ्यावरचे किल्ले जिंकायची आणि मोक्याच्या जागी तटबंदी उभारायची एक पद्धतशीर मोहीम आखली. आपल्याभोवती त्यांनी निवडक माणसं जमवली. त्यात इंग्रजी भाषेत ज्याला 'टेक्निशियन' म्हणतात तसे तंत्रज्ञ होते, जहाजं बांधणारे होते. पितळ, जस्त, असल्या धातूंची कारागिरी जाणणारे होते; तोफा ओतणारे होते. त्यांच्या नोकरीत मुसलमान कारागीर होते, तसेच पोर्तुगीज, फ्रेंच, डचदेखील होते.

कोकण किनाऱ्यावर शिवाजी महाराजांनी एकूण तेरा नवे जंजिरे किल्ले बांधले आणि इतर अनेक किल्ल्यांची डागडुजी आणि अधिक सुधारणा केली. दोन्ही बाजूंना टेहळणीसाठी मोठे झरोके केलेल्या जहाजांचे अवशेष अजूनही आढळतात. मालवणजवळच्या बेटावरचा सिंधुदुर्ग अजूनही बराचसा शाबूत आहे. मराठा आरमाराचं मुख्य ठाणं करण्याच्या उद्देशाने हा किल्ला बांधला होता; पण त्याच्या नशिबात ते वैभव लिहिलेलं नव्हतं. ज्याच्या बत्तीस बुरुजांवर बत्तीस निशाणं फडकत होती, तो किल्ला आता भंगलेलं चिलखत चढवलेल्या एखाद्या खिन्न पहारेकऱ्यासारखा आपल्या जागेवर विस्मृतावस्थेत उभा आहे. सारा सिंधुदुर्ग हिंडूनही त्याच्या प्रवेशद्वाराचा पत्ता लागणार नाही; कारण अनेक भिंतींच्या आड तो दडवला गेला आहे आणि आश्चर्य म्हणजे त्या अजूनही टिकून आहेत. जणू काय -

न घडो कधी या । सिंधुदुर्गावरी
सागराक्रमण ।
न घडो वा कधी । शत्रूच्या सैन्याचे
येथे आगमन ।।

अशा अर्थाच्या मंत्राचं शिवाजी महाराजांनी नेमलेल्या पुजाऱ्याचे वंशज रोज जे तिथे पठण करीत, त्याची शक्ती अजूनही टिकून असावी.

शिवाजी महाराजांच्या, आकाराने फारच मोठ्या वाटणाऱ्या पावलाच्या चुन्यात उमटवलेल्या ठशाची सिंधुदुर्गात रोज पूजा केली जाते.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# हेडाम

**महादेव मोरे**

*मानवी दुःखाचे आणि जीवनाचे विविध पदर वास्तवतेने उलगडणाऱ्या कथांचा संग्रह*

### एव्हार

**मा**झी बिनपेट्रोलची हीरो होंडा ऊर्फ हीरो कंपनीची जुनी सायकल हाड्याताप झालेल्या माणसागत झिंगायला लागली होती– म्हणजे तिच्या पुढील चाकात बारीक पंक्चर होतं. आज चाकात हवा मारली की, ती दिवसभर राहायची नि दुसऱ्या दिवशी वाळुसरा पडून सुकेमारलेल्या वेलावरल्या बेलवांग्यागत मलूल होऊन टायर खाली बसायची! रोज

हवा मारून कंटाळलो नि एके दिवशी दुपारी जेवायला घरी चाललो असताना वाटेतील नेहमीच्या सायकल दुकानवाल्यासमोर सायकल थांबविली. दुकानवाला मेस्त्री एका सायकलीचं चाक खोलून बसला होता.

''मेस्त्री, सवड हाय का?'' मी त्याला विचारलं.

''हाय की–या!'' मेस्त्री म्हणाला, ''एवढं चाक आवळून सायकलीला फिट्ट केलं की, झालंच बघा–'' आणि त्यानं विचारलं, ''का, काय काम हुतं?''

''पंक्चर काढायचं हुतं म्होरल्या चाकाचं!'' मी सांगितलं.

''मी वळीकलंच– गेलं तीन दिवस तुम्ही रोज हवा मारून घिऊन जाताना, हे तर मी बघतच हुतो की! पन मनात म्हटलं–महादेवअण्णाची तब्येत चांगली हाय, रोज पंप मारतात, तेवढाच त्येनला यायामबी हुतोय!!'' बोचकारे काढणारा अस्वली विनोद गंभीर आवाजात करीत मेस्त्री म्हणाला, ''सायकलचं स्ट्यांड पाडा, लावा सायकल. हातांतलं हे काम आवरतच आलंया. आता चाक बशीवतो ते तुमचंच पंक्चर काढतो. परगाववाला ह्यो सायकलवाला हाय. बाजार कराय गेलाय, ईल एवढ्यात. चाकातल्या बेअरिंगचं बॉल खराब झालं होतं; दुसरं नवीन घाटलं...!''

मेस्त्री एवढं बोलतोय तोवर तो बाजार कराय गेलेला सायकलवाला टपकलाच. मेस्त्रीनं झट्‌दिशी चाक आवळलं व आडवी पाडलेली सायकल उभी केली, तसा ते खेडूत म्हणाला,

''मेस्त्री बिल कितसं झालं?''

''हे बघा, चाक काढून बसवायला आम्ही धा रुपय घेतावच; बेअरिंगचं बॉल नवीन घाटल्यात, त्येचं वीस रुपये हुत्यात. आता तुम्हासारख्याकडनं आम्ही तरी कशाला जास्त पैसे घीवू? तुम्ही तर नेहमी आमच्याकडं— येणारं वैवाटीचं!!''

तो सायकलवालाही खेड्यातल्या माणसागत ख्वट्ट होता, चिंगट होता. त्यानं वीसची नोट तशीच त्याच्या हातात कोंबली, पण मेस्त्री ती खिशात जास्तानाला व्यवस्थित न ठेवता तशीच हातात धरीत म्हणाला,

''न्हाय, आनी धा द्यायलाच पायजेत, मी मिनिममच मागितल्यात! अहो, नुस्तं पंक्चर काढायलाच आम्ही धाची पत्ती घेताव! आनी हे तर बॉडीस्नं चाक काढून घेऊन बॉल घालायचं आस्तंय! आनी तुमची बेअरिंगची एक वाटीबी खराब झालीती!'' जवळच पडलेली एक वाटी हातात धरून दाखवीत मेस्त्री म्हणाला, ''ही बघा, वाटीच्या सीटला कसं खराब बॉल

घासून खरबडू-खरबडू झालंय. सीट आसंच ठेवली तर नवं बॉल बी खराब हुत्यात, म्हणून मी माझ्याजवळची एक सीट घाटलीया, नि तुम्हाला म्हणून त्येचं आनी बिल लावलं न्हाई!!''

तसं त्या सायकलमालकानं खिसं चाचपून पाचचा एक बंदा काढून मेस्त्रीच्या हातावर टिकविला. तेवढ्यानंही समाधान न झालेला मेस्त्री म्हणाला,

''हे लैच कातरल्यागत होतंय!''

''हूंदे! एवढंच पैसे उरल्यात बाजार करून. म्होरल्या खेपी बघू!'' आणि तो सायकलवाला आपल्या सायकलीवर टांग टाकून निघूनही गेला.

तसा मेस्त्री बोलला,

''बघीटलासा, कशी श्यांपल आसत्यात एकेक? बरं, ते ऱ्हाऊ दे. आणा हिकडं सावलीत सायकल तुमची. भाहीर लै ऊन हो! गुढीपाडवा पर्वा झाला, आता हे असंच!''

तशी मी माझी सायकल त्याच्या दुकानापुढील शेडमधील सावलीत नेली. त्यानं ती आडवी पाडून पंक्चर झालेल्या चाकातील इन्नर बाहेर काढता-काढता मला म्हटलं,

''तुम्हाला जेवायला आज लई उश्शेर झाला हो!''

''चालायचंच. तुझ्या-माज्यासारख्या लहान-सहान धंदेवाल्यांच्या पोटात दुपारचा आन्न परसाद कवा पडंल त्येची काय नक्की टाइम नस्ती!'' इति मी.

''हांम बघा. कसं राईट बरोब्बर बोल्लासा!'' आणि त्यानं चाकातनं बाहेर काढलेल्या इन्नरीला व्हॉलट्यूब बसविली न् मग आपल्या जवळच पडलेला हवा मारायचा पंप पुढे करीत तो म्हणाला, ''हे घ्या, मारा दोन पंप—एवढी इन्नर च्येक करून प्याच लावतो, ते सुटाच तुम्ही जेवाय!''

पंप घेऊन मी हवा मारतोय, तोवर रस्त्याने जाणारा एक खेडूत दुकानाच्या शेडपुढे थांबला व शिवारात हाक मारावी तशा खड्या आवाजात म्हणाला,

''अहो मेस्त्री ऽ ऽ कुणाची सेकंड ह्यांड जुनी सायकल द्यायची हाय काय?''

त्या खेडुताच्या अशा आवाजाने रस्त्याने जाणारे एक-दोघे थांबले. त्यांना वाटले, आता काही भांडणच ऐकायला-पाहायला मिळते. भांडण एन्जॉय करीत त्यात करमणूक शोधणारे काही महाभाग असतात. पण इथं

तसं काही नाही, हे दिसून येताच त्यांनी काढता पाय घेतला.

मेस्त्रीनं आवाजाच्या दिशेनं पाहिलं. कमरेला धोतर, वर लांब हातोप्याचा पांढरा मळकट शर्ट व डोस्कीला तसलाच पांढरट पटका... रानातल्या उनातानाट राबून झालेला काळपट बनहट्टी कलर, उंदरागत बारीक पिचके महामतलबी वाटणारे डोळे आणि चंचीतल्या पानाचा बार हर घटकेला तोंडात भरल्याने लालट झालेले ओठ व हातात एक रिकामी पिशवी– बहुधा बाजारहाट करण्यासाठी तो बाजारपेठेत जात असावा!

मेस्त्रीनंही त्या खेडुताला नजरेनं जोखलं आणि विचारलं,

''खरंच घेणार हाय सायकल, का आपलं फुकापासरी उगंच चौकशी?''

''खरंच पायजे हाय मला, यल्लाम्मा शपथ गा!'' खेडुताला हर घटकेला यल्लाम्मा शपथ खायची सवय असावी. ''म्हणून तर तुला इच्चाराय लागलोय!''

''मग आवाजाची पट्टी जरा खाली आण की! कोण म्हणील, भांडाणच सुरू हाय ह्येचं!'

''अहो, माजा आवाजच तसा हाय हो! लोकं म्हंत्यात—लहानपणी माज्या नरड्यात शेंदूर जरा जास्तच घातला असणार!'' आन् खि:क् करून तो हासला.

''हे बघ, माझ्याकडं हाय एक सायकल, पण रुपयं दीड हजार बसणार; कमी न्हाई का जास्त न्हाई.''

''कायऽऽ दीड हजार!'' बुडाला चटका बसल्यावानी खेडुताचा आवाज आला.

''व्हय दीड हजार. काय दीड लाख बोल्लो न्हाई तुला! पर्वाच एकानं मागितली ती, पन् पन्नास रुपड्यात सौदा मोडला. हायक्युलस कंपनीची सायकल हाय, नवीनला किती बसत्यात, म्हाईत हाय न्हवं तुला?''

''माहिती आसंना तर! आमची बी हयात सायकल वापरण्यातच गेली. पैलं माल तर दावा, का आदीच आपलं, 'बाजारात तुरी आनी भट भटणीला मारी?' ''

''चल, दावतो–'' बसून माज्या सायकलीची इन्नर काढलेला मेस्त्री मग उठला व माझ्याकडे पाहत म्हणाला, ''म्हादेवअण्णा, आलोच एवढ्यात. आधीच तुम्हाला जेवणाला लई टाइम झालाय, जरा आनी पाच मिटं कढ काढा.''

आणि खेडुताला घेऊन तो लगतच असलेल्या आपल्या गोडावून ऊर्फ

कचरा खोलीत घेऊन गेला.

काही वेळाने दोघे कलकल करीतच बाहेर आले. खेडुत म्हणत होता,

''मी मागू काय, राग येणार नसला तर?''

''माग की! ह्यो एव्हार हाय! आमचा मालबी चोख हाय.''

''रुपय हजार देतो.''

''ही सायकल काल लडतरीची न्हवं, का चोरीची न्हवं. एव्हार ठरला की, चोख कागदपत्रं करून देतो तुला– पायजे तर बॉण्डपेपरवरबी!''

''मी कुठं म्हन्लो गा– सायकल लडतरीतली म्हणून? मी मन्लो, रुपय हजार देतो.'' खेडुतही काही कच्चा न्हवता, तर झाडावरच पिकलेला होता!

''चलच आता तू, ऊन हुतंय. ह्यो एव्हार काय जमायचा न्हवं,'' मेस्त्री म्हणाला.

''बरं, आनी वर शंभरभर खुशाली दिल्यावानी देतो.'' खेडुतही चिंगट इंटरनॅशनल विद्यापीठात एम.ए. झाल्यावानी बोलत होता.

''रुपय चौदाशे दे, जा!'' मघाशी दीड हाजाराची मागणी करणारा मेस्त्री तो आकडा सोडून शंभरभर खाली घसरला.

''आनी पन्नासभर चढ देतो– साडे आक्राशे देतो.'' नि तो खेडुत म्हणाला, ''मेस्त्री, आता काय म्होरं बोलायचं न्हाई.'' आणि त्यानं शर्टाच्या आत घातलेल्या मुंड्याच्या खिशात हात घालून शंभरची एक नोट व पाचचा एक बंदा रुपाया काढला व ती रक्कम मेस्त्रीच्या हातावर ठेवीत म्हटलं, ''हे सस्काराचं आडव्हान्स म्हणून घ्या– येत्या एक तारखेला माजी पेन्सूल येती, ती आली म्हंजे उरलेली रक्कम दिऊन सायकल घिऊन जातो.''

''एवढ्यात न्हाई जमत.'' सकाळचं घरातनं बाहेर पडताना बायकोबरोबर भांडून आल्यावानी मेस्त्रीचं तोंड झालं, ''तुला म्हणून सोडतो– दोनशे कमी कर, वट्ट तेराशे दे.''

''मी अकराशे म्हन्तो, तू तेराशे म्हणतोस, दोन्हीत निस्ता दोनशे रुपड्यांचा फरक!'' बोलता-बोलता त्या खेडुताच्या आवाजाची पट्टी वाढत गेली, ''आता एवढंबी सोसवंना तुला? जमतंय घे, एव्हाराचं फिक्स कर.''

''एवढ्यानं न्हाई जमत! तेराशे घट्टच! लास्ट!'' मेस्त्री म्हणाला, ''हे तुजं पैसे धर.''

''मी दिल्यालं पैसं परत घेत न्हाई कधी! ते ऱ्हावू दे तुलाच!'' आणि

तो खेडुत चालू लागला...

"आगाऽऽ आगाऽऽ हे घे– ह्यो एव्हार न्हवं! मला मान्य न्हवं. मला मान्य न्हाई हेऽऽ' मेस्त्री म्हणाला,

तरीही तो खेडुत थांबण्याचं काही लक्षण दिसेना! बिनब्रेकची सायकल घसारतीला लागावी, तसा तो म्होरंच सुटलेला. ते बघून मेस्त्रीनं आपल्या कपाळावर हात मारून घेत म्हटलं,

"ही काय व्हैकाची वाटणी म्हणायची? एक तारीख आजून एक आठवडाभर लांब, आनी कोण आडकून बसणार, सस्कार घिऊन! द्या जावा त्येला हे–"

आता ह्या एव्हारात भांडाण होणार, तेवढीच चकटफू मज्ज्या बघाय– अशा विचारानं बाहेर बऱ्यापैकी गर्दीही जमली होती. त्यातील एकाच्या हातात मेस्त्रीनं आपल्या हातावरली ती रक्कम ठेवली, ती खिशात ढकलत तो बघ्या म्हणाला,

"आता तुलाबी नको नि त्येलाबी नको, ऱ्हावू दे मलाच हे सांच्या क्वाटरला."

हे ऐकताच वावभर म्होरं गेलेला खेडुत तरातरा मागं आला नि त्या बघ्याला म्हणाला,

"हे बरं हाय– आयजीच्या जीवावर बायजी उदार... ध्याडचा दिवा रात्री अंधार! मी काय चोरी कराय् न्हाई, घसाऽसा राबल्याला पैसा हाय माजा त्यो! आण हिकडं पैसे ते... एव्हार मोडला तर मोडला, सायकली काय दुसऱ्या मिळत न्हाईत? का हिलाच टिकली लावलीया?"

वटावटा करीत खेडुत निघून गेला. ह्या गोमगाल्यात मघा हवा भरलेल्या इन्नरीतली हवा केव्हाच निघून गेली होती. मेस्त्रीनं परत माज्या हाती पंप दिला व म्हटलं,


"मारा आता चार पंप, इन्नर बसली खाली! तीन झालं. तुम्हास्नी जेवाय लै टैम झाला हो! मघापासनं एरंडाचं गुऱ्हाळ! ना देना, ना लेना, बीच में कंदील लगा के जाना! आखीर एव्हार मोडलाच, न्हवं?"

**– दै. तरुण भारत**

*रविवार पुरवणी, २४ मार्च २०१९*

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# आनंद जन्मला

**भा. द. खेर**

*मुकुंदा आणि सुनंदाच्या पौर्णिमेच्या चंद्रासारखा परिपूर्ण संसार... चंद्राला या लागलं ग्रहण... अन...?*

**सुनंदा** शेजारीच झोपली होती; पण मुकुंदाला झोप लागत नव्हती. किंबहुना, ती शेजारी झोपली होती म्हणूनच त्याला झोप लागत नव्हती. त्याची झोप उडण्यास पर्यायाने तीच कारणीभूत झाली होती.

२५

तशीच घटना त्या घरात घडली होती आणि ती घडल्यापासून त्या घरातील सारा आनंद पार मावळून गेला होता. त्या घराचीच जणू झोप उडाली होती.

मध्यरात्रीचा सुमार असला पाहिजे. चंद्र ऐन माथ्यावर आला होता आणि त्याच्या प्रकाशात सारी सृष्टी धुऊन निघत होती आणि वस्तुमात्राला एक प्रकारचा रुपेरी रंग चढला होता. समोर दिसणाऱ्या लॉ कॉलेज टेकडी आणि हनुमान टेकडी यांच्या अरुंद घळीत रुपेरी रंगाचा अविरत शिडकावा होत असल्याचा भास होत होता. दिवसाच्या प्रहरात त्या भागात दिसणारी हिरवीगार वनश्री आता रुपेरी रंगात बुडाली होती. हिरवा आणि रुपेरी या दोन रंगांचे एक प्रकारचे मनोहर मिश्रण त्या भागात तयार झाले होते. सृष्टिकर्ता हा खरोखर सिद्धहस्त असा शास्त्रज्ञ असला पाहिजे आणि अशा प्रकारच्या विविध रंगांची रंगतदार मिश्रणे तयार करणे, या कलेत त्याचा हातखंडा असला पाहिजे! किती प्रकारच्या रंगांची विविध मिश्रणे त्याने तयार केली होती आणि त्या रंगांचा मुलामा या सृष्टीच्या विविध भागांना फासला होता! कोठेही रंगसंगती अणुमात्रही बिघडली नव्हती.

एरवी हा देखावा पाहून मुकुंदाचे भान अगदी हरपून जाई. अशा वेळी त्याचे बालपण जागृत होत असे. पौर्णिमेच्या किंवा पौर्णिमेच्या आसपासच्या रात्रीतील चांदण्यांत मुकुंदाचा अवखळ आनंद हमखास जागृत होई. पौर्णिमेची रात्र जवळपास आली म्हणजे सुनंदा समजून चाले की, ही स्वारी आता रंगात येणार आणि स्वारीच्या वागण्यातील सारा धरबंध सुटणार. तिचा हा हिशेब कधीच चुकत नसे.

एरवी मुकुंदाला पंचांगाचे फारसे ज्ञान नव्हते; परंतु पौर्णिमा जवळ येत चालली म्हणजे तो सुनंदाला विचारी, ''नंदा, पौर्णिमा केव्हा आहे गं?''

त्याच्या बोलण्यातील आशय लक्षात घेऊन ती उत्तर देई, ''अजून खूप अवकाश आहे.''

''अगं, खूप म्हणजे काय, आज एकादशी, उद्या द्वादशी...''

मग त्याची नक्कल करून बोबड्या भाषेत ती म्हणे, ‘‘हं, परवा त्रयोदशी आणि...’’

‘‘मग आलीच की पौर्णिमा. खूप अवकाश कुठला आहे?’’

असं म्हणून मुकुंदा जवळ येऊन तिच्या गालावर हळूच एक टिचकी मारत असे. मग ती मनात म्हणे, ‘‘हं! पौर्णिमेच्या नाटकाची ही नांदी बरं का!’’

खरोखरच ती नांदी असे; आणि प्रत्यक्ष पौर्णिमेची रात्र उगवली म्हणजे मुकुंदाच्या अवखळ नाटकातील एकेक प्रवेश सुरू होत असे. त्या दिवशी जेवणखाण संध्याकाळीच उरकून घेण्याची आज्ञा सुटायची. मुकुंदा संध्याकाळी सहा वाजता ऑफिसमधून आला म्हणजे बाहेरच्या दारातूनच ओरडू लागे, ‘‘नंदा, स्वयंपाक तयार आहे ना?’’

यावर चट्‌कन पुढे येऊन तिने होकारार्थी मान हलविली पाहिजेच. आपले काळेभोर टपोरे डोळे त्याच्याकडे रोखून तिने म्हटलं पाहिजे, ‘‘तुम्ही हात-पाय धुवा आणि पानावर येऊन बसा!’’

यावर ऑफिसच्याच कपड्यांत त्याने पुढे होऊन सुनंदाचे दोन्ही खांदे गदगदा हलवून म्हणावे, ‘‘Oh! That’s like a splendid girl’’

अरुणच्या जन्माच्या वेळी सुनंदाचे दिवस अगदी भरत आले होते आणि एका पौर्णिमेच्या दिवशी ऑफिसमधून आल्याबरोबर त्याने तिला असंच गदगदा हलविलं होतं. त्यावर लटक्या रागाचा अभिनय करून तिने म्हटलं होतं, ‘‘हा तुमचा पोरकटपणा केव्हा संपणार? तुम्ही आता बाबा होणार आणि माझ्या या अशा अवस्थेत एखाद्या केळीच्या खुंटासारखं मला गदगदा हलवणं बरं नव्हे. सध्यातरी तुम्ही असं करू नका. थोडं सबूर!’’

यावर मुकुंदा म्हणाला होता, ‘‘वा! पौर्णिमेच्या नाटकातील टाळीचाच प्रवेश तू गाळावा असं म्हणतेस. मग पुढील नाटक कसं रंगणार? रंगणाऱ्या नाटकाची हीच योग्य अशी नांदी आहे.’’

आणि खरोखरच त्यांचं पौर्णिमेचं नाटक नेहमी रंगत जाई.

जेवणखाण उरकलं आणि चिमुकला अरुण झोपला म्हणजे त्या दोघांना अगदी मुक्तद्वार असे. घरात कोणी वडीलधारं माणूस नव्हतं. एकदा लग्न लागलं म्हणजे प्रेमाचा पहिला बहर ओसरतो, ही गोष्ट त्यांच्या गावीही नव्हती. संसाराची कोणतीच बंधनं त्यांच्यावर पडलेली नव्हती. सुखी संसाराला लागणाऱ्या साऱ्या गोष्टी त्यांच्या चिमुकल्या संसारात नांदत होत्या. आर्थिक ओढग्रस्तीमुळे अनेकांच्या संसारात निर्माण होणारं वैगुण्य त्यांच्या संसारापासून फारच अंतरावर होतं. आर्थिक टंचाईचं वारं त्यांच्या दारापर्यंत येऊन पोचलं नव्हतं. त्यांच्या सुखी संसारवेलीवर अरुणसारखं सुवासिक फूल नुकतंच उमललं होतं. मुकुंदा आणि सुनंदा यांच्या संसाराला खरोखरच पौर्णिमेची उपमा शोभली असती. सुखाचा चंद्र त्यांच्या संसाराच्या आकाशात ऐन माथ्यावर आला होता; आणि सुखी संसाराची ही पौर्णिमा साजरी करण्यास कोणताच प्रत्यवाय नव्हता.

मुकुंदाचं मन हे जात्याच कवीचं होतं. कॉलेजात असताना त्याने अनेक कविता केल्या होत्या. पुढे सुनंदासारखी सुंदर मुलगी त्याच्या संसारात आली होती. प्रत्यक्ष जिवंत काव्याने त्याच्या घरात प्रवेश केला होता; आणि मग कल्पनेच्या काव्याने त्याच्या उंबरठ्याबाहेर पाऊल टाकलं होतं. मुकुंदाच्या कविहृदयाची सुनंदाला पुरेपूर जाणीव होती. त्यांच्या लग्नाच्या मुहूर्ताचा प्रश्न उभा राहिला, तेव्हा मुकुंदा तिच्या वडिलांना म्हणाला होता, ‘‘पौर्णिमेच्या मुहूर्तावर आम्ही लग्न लावणार.’’

यावर सुनंदाचे वडील भय्यासाहेब त्याला हसत म्हणाले होते, ‘‘पण पौर्णिमेला मुहूर्त हवा ना?’’

‘‘वा! पौर्णिमा हाच मुहूर्त. भय्यासाहेब, तुम्ही हे पंचांग गुंडाळून ठेवा आणि मला सांगा की प्रत्येकाच्या आयुष्यात लग्न म्हणजे प्रेमाचीच पौर्णिमा आहे ना? मग आयुष्यातील ही प्रेमपौर्णिमा साजरी करण्यास पौर्णिमेसारखा दुसरा कोणता मुहूर्त असू शकेल?’’

आपल्या भावी जावयाचं हे म्हणणं जुन्या पठडीतील भय्यासाहेबांना मुळीच पटलं नव्हतं; परंतु आपला जावई मोठा रसिक आहे, ही गोष्ट मात्र त्यांना पुरेपूर पटली होती. अखेरीस जावईहट्टाला मान मिळाला होता आणि पौर्णिमेच्या मुहूर्तावर त्याचं लग्न लागलं होतं.

तेव्हापासून प्रत्येक पौर्णिमेला आपल्या लग्नाचा वाढदिवस साजरा करण्याची प्रथा त्याने सुरू केली होती.

प्रत्येक पौर्णिमेच्या दिवशी पूर्व दिशेला चंद्राचं लालसर फिकट पूर्णबिंब दिसू लागताच मुकुंदाच्या प्रेमसागराला अक्षरश: भरती येई. जेवण आटोपून आवरासावर करून सुनंदा त्याच्या खोलीत आलेली असे. चिमुकला अरुण पाळण्यात केव्हाच झोपी गेलेला असायचा. पूर्व बाजूच्या खिडकीतून पौर्णिमेच्या चंद्रबिंबाकडे टक लावून बघत असताना मुकुंदा एकदम सुनंदाला म्हणायचा, ''ए नंदा, लवकर इकडे ये. ते बघितलंस का?''

बाहेर बघण्यासारखं काही नाही, या गोष्टीची सुनंदाला कल्पना असे; परंतु त्याच्या हाकेसरशी ती खिडकीशी जाऊन त्याच्याजवळ उभी राहत असे. अशा वेळी तिची पाठ त्याच्याकडे असे. तिने आपल्या डोक्यात घातलेल्या टपोऱ्या गुलाबाच्या फुलाकडे प्रथम त्याचं लक्ष जाई; पण मग लगेच तिच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवून तो म्हणे, ''त्या चंद्राकडे बघितलंस का?''

''हो. नेहमीच बघते.''

एकदा तो तिला म्हणाला, ''हे बघ. नेहमी जरी या चंद्राकडे बघितलं तरी प्रत्येक वेळी त्याचं नवं रूप आपल्या दृष्टीस पडतं!''

यावर सुनंदाने मागे मान करून त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने बघितलं तेव्हा तो म्हणाला, ''या बेट्या कवींना खरोखर फार थोडं समजतं; आणि मी जर एके काळी कवी नसतो तर साऱ्या कवींना समुद्रात बुडविण्याची आज्ञा मी दिली असती.''

त्याच्या बोलण्याचा रोख अद्यापही तिला समजला नव्हता. ती

काही विचारणार, एवढ्यात तोच पुढे म्हणाला, ‘‘आता हेच बघ. कोणी कवी म्हणतो की, या चंद्रावर डाग आहे. कोणी म्हणतो की, चंद्रावर टेकड्या आहेत, समुद्र आहे; पण खरा कवी कालिदासच. त्यानं चंद्राला सुंदर स्त्रीच्या मुखाची उपमा दिली आहे!’’

आणि थोडा वेळ थांबून एखाद्या काव्यकल्पनेत धुंद झाल्याप्रमाणे तो म्हणाला, ‘‘अगदी शंभर टक्के उपमा! या चंद्राला खरोखरच ती उपमा शोभते.’’

मग त्याने आपलं तोंड सुनंदाच्या कानाजवळ नेलं आणि एखाद्या प्रियकराने आपल्या प्रेयसीला एखादं गूढगुंजन ऐकवावं त्याप्रमाणे तो बोलू लागला. तो म्हणाला, ‘‘ते बघ चंद्राचं नाक; अगदी चाफेकळीसारखं आहे, नाही का? अगदी तुझ्यासारखं!’’

असं म्हणून त्याने तिचं तोंड वळविलं आणि तिचं नाक हातात धरून हलविलं. सुनंदा ओरडून म्हणाली, ‘‘हे असं करायचं असेल तर मी सरळ जाऊन झोपते.’’

मग मुकुंदा म्हणाला, ‘‘बरं, आता नीट बघ. ते बघ चंद्राचं कपाळ; आणि ते गाल बघितलेस का?’’

आणि थोडा वेळ थांबून तो म्हणाला, ‘‘वा! या वेळी चंद्राच्या गालाला एक झकास उपमा आठवली.’’ सुनंदाने त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने बघितलं तेव्हा तो म्हणाला,

‘‘या तुझ्या गालाची; अगदी या तांबूस गालाची!’’

हे म्हणताना त्याने आपली तर्जनी तिच्या गालावर दोनदा आपटली आणि बोलताना आपलं तोड तिच्या गालाजवळ नेलं. त्याचा तो आविर्भाव पाहून ती दूर सरकून म्हणाली, ‘‘इश्श्य! असं वागायचं असेल तर मला काही सांगू नका.’’

आणि थोडा रागाचा आविर्भाव आणून ती पुढे म्हणाली, ‘‘माणसानं एक मुलगा झाल्यानंतर तरी जरा सभ्यतेनं वागावं...’’

‘‘आणि दोन मुलं झाल्यानंतर दुप्पट सभ्यतेनं वागावं, असंच

ना? बरोबर आहे ना त्रैराशिक? पण म्हणूनच दुसऱ्या मुलाचा बाप होण्याची पाळी मी आपल्यावर आणणार नाही. ही सभ्यतेची बंधनं पाळावीत कोणी? त्यापेक्षा एक मुलगा होऊन असं अवखळपणानं वागणंच मला बरं वाटेल.''

असं म्हणून मुकुंदा पुन्हा तिच्याजवळ गेला आणि तिचा हात धरून तिला काही सांगू लागला, तेव्हा सुनंदा काकुळतीने म्हणाली, ''हे असं वागणं बरं नाही. समोरच्या बंगल्यातून कोणी बघितलं तर काय म्हणतील?''

''हात्तिच्या, हीच ना भीती? तुझं म्हणणं असंच ना की, कोणी काही बघितलं नाही म्हणजे माणसानं वाटेल ते करावं!''

आणि मुद्दाम गंभीरपणाचा आव आणून मुकुंदा पुढे म्हणाला, ''नंदा, माझं तत्त्वज्ञान वेगळं आहे. जे चांगलं ते कोठेही करावं. आम्ही आमच्या बायकोशी जरा मनमोकळेपणानं वागायचं नाही तर कोणाशी? आणि लोक काय म्हणतील? आम्ही काय अनेक मुलींना फसवून त्यांच्याशी लग्नं लावली आहेत? का पैशाच्या लोभानं कोणा श्रीमंत विधवेचा खून केला आहे? का खोट्या सरकारी कचेऱ्या उघडून सरकारचा पैसा घशात घातला आहे? का...''

यावर सुनंदाने त्याच्या तोंडावर हात ठेवून म्हटलं, ''हं हं! पुरे, पुरे! फार पांडित्य वाहवत चाललं.''

मुकुंदाने तोच तिचा हात आपल्या हातात घेऊन तिला समोर उभी करून म्हटलं, ''आपलं काव्य अपुरंच राहिलं. मी तुला चंद्राच्या गालाचा रंग कोणता ते सांगत होतो, नाही का?...''

''हे पाहा, मला किनई चित्रकार व्हायचं नाही, तेव्हा चंद्राच्या गालाचा रंग सांगण्याची काही गरज नाही.'' असं म्हणून ती मनसोक्त हसली.

''हे पाहा! अगदी बरोबर असेच - असेच आहेत चंद्राचे दात- तुझ्यासारखे पांढरेशुभ्र आणि...'' त्याला पुन्हा थांबवून ती म्हणाली, ''तुमचं हे चंद्राचं वेड सुरू झालं म्हणजे मला वाटतं, की ही

पौर्णिमा दर महिन्याला येऊच नये! चंद्र बघितला म्हणजे तुमचा तोल किती जातो!''

या वेळेपर्यंत चंद्र चांगला वर आलेला असे आणि त्याचा उगवतीच्या वेळेचा तांबूस रंग जाऊन त्याने रुपेरी रंग धारण केलेला असे. बघता-बघता चंद्र ऐन माथ्यावर येई, मग हवेत गारवा येई. पलंगावर मच्छरदाणी लपेटून मुकुंदाने बिछान्यावर पाठ टेकली, तरी त्याची टकळी थांबत नसे. अशा गप्पागोष्टी चालू असतानाच सुनंदाचा डोळा लागे. त्याच्या बोलण्यावर तिने हुंकार दिला नाही म्हणजे तो तिला हलवून म्हणे, ''वा गं वा! इतक्यातच झोपलीस वाटतं?''

तेवढ्यात कोठूनतरी घड्याळात बाराचे ठोके पडल्याचा आवाज ऐकू येई आणि त्याच वेळी नेमके लॉ कॉलेजचे टोल पडत. ते ऐकून ती म्हणे, ''ते बघा. बारा वाजले. आता झोपायला हवं.''

तो म्हणे, ''माझे नाही अजून बारा वाजले. हे पाहा नंदा, आज पौर्णिमा आहे. विसरलीस वाटतं?''

ती झोपण्याचा खूप प्रयत्न करी; पण तो तिला झोपू देत नसे. रात्र संपे; पण त्याच्या गप्पा कधी सरत नसत. अखेरीस चंद्रबिंब पश्चिम क्षितिजाकडे टेकलं म्हणजे एखादी जांभई देऊन तो त्या निस्तेज झालेल्या चंद्राकडे बघून म्हणे, ''चालला बेटा घरी! आता आपणही झोपलं पाहिजे. नंदा, झोप आता तू!''

पण, त्याचं हे बोलणं ऐकण्यापूर्वी सुनंदा केव्हाच झोपी गेलेली असे; परंतु आज? आकाशात चंद्र होता. तो ऐन माथ्यावर आला होता. सुनंदा त्याच्या शेजारीच झोपली होती. पौर्णिमेच्या रात्रीप्रमाणे आजही त्याला झोप येत नव्हती; पण झोप न येण्याचं कारण केवढं वेगळं होतं! चंद्र आकाशाच्या मध्यावर आहे, सुनंदा शेजारी झोपली आहे आणि तो बिछान्यावर एकही शब्द न बोलता पडला आहे, असं आतापर्यंत कधी घडलं नव्हतं. आज भलताच प्रसंग त्याच्या आयुष्यात निर्माण झाला होता, अघटित अशी घटना घडली होती;

आणि त्याची झोप पार उडाली होती. वर्षाऋतूच्या प्रारंभी वातावरणातील उष्णता तर कमी होऊ नये; पण आकाशात तर मेघ दाटून यावेत म्हणजे ज्याप्रमाणे गुदमरून जाते, सारे वातावरण कुंद बनते त्याप्रमाणे या घरात अवस्था निर्माण झाली होती. निरगाठ पडली होती; पण ती सुटण्याचा मार्ग मुळीच दिसत नव्हता.

सुनंदाला अरुणच्या पाठीवर दिवस गेले आहेत ही गोष्ट जेव्हा मुकुंदाला समजली तेव्हा त्याने एकदम हाय खाल्ली, त्याला परमावधीचा धक्काच बसला. वस्तुत:, घरात अपत्यजन्म होणार म्हणून घरातील वातावरण आनंदाने नुसते फुलून जायला हवे होते, सुखाने धुंद व्हायला हवे होते; परंतु ती बातमी समजल्यावर ते वातावरण दु:खाने कुंद बनले होते. आतापर्यंत या घराला दु:खाने कधी स्पर्श केला नव्हता. आता दु:खाने घरातच ठाण मांडले होते. अरुणच्या जन्माच्या वेळी या घरात सुखाचे सारे सोहळे साजरे झाले होते; आणि आज त्याच घरात सुखाचा मागमूसही दिसत नव्हता. एक नवेच दुखणे या घरात निर्माण झाले होते.

ती गोष्ट कळल्यापासून या दोन दिवसांत मुकुंदाचा चेहरा किती ओढलेला दिसत होता! या दोन दिवसांत तो जणू दहा वर्षांनी म्हातारा झालेला आहे, असं वाटत होतं. दोन दिवसांपूर्वी तो ऑफिसमधून संध्याकाळी घरी आला, तेव्हा सुनंदा त्याच्या स्वागतासाठी समोर उभी नव्हती. कोणाच्यातरी ओकाऱ्यांचा आवाज आतून येत होता. तो आत जाणार, इतक्यात शेजारच्या उमाकाकू बाहेर आल्या आणि त्याला बघताच त्या हसत म्हणाल्या, ''मुकुंदा, अरे एक नवा पाहुणा तुझ्या घरात येणार आहे बरं का!''

प्रथम त्याला त्यांच्या बोलण्याचा अर्थ समजला नाही तेव्हा उमाकाकू पुन्हा म्हणाल्या, ''अरे बघतोस काय? अरुणच्या पाठीवर...''

उमाकाकूंचे पुढील शब्द त्याला ऐकूसुद्धा आले नाहीत. त्याची कानशिलं तापली, त्याचं डोकं गरगरू लागलं आणि आपल्या

पायाखालचा धरणीचा आधार सुटला आहे, असं त्याला वाटू लागलं. श्रीरामाने सीतेच्या पावित्र्याची शंका घेतली, तेव्हा आपल्या पायाखालची धरणी दुभंगून आपल्याला तिने तिच्या उदरात कायमचा आश्रय द्यावा, असं तिला वाटलं होतं. मुकुंदाची अगदी हीच अवस्था झाली.

पावित्र्याची शंका!

होय. त्याला एकदम तिच्या पावित्र्याची शंका आली होती आणि ती शंका येऊन उलट त्यालाच सीतेप्रमाणे धरणीच्या उदराचा आश्रय घ्यावासा वाटला होता. म्हणजे या श्रीरामाला आपल्या पत्नीच्या पावित्र्याची शंका आली होती आणि हाच श्रीराम भूमीच्या उदरात जाऊ पाहत होता.

कोणत्याही सुखी संसारात पतीला पत्नीच्या किंवा पत्नीला पतीच्या पावित्र्याची शंका येण्यासारखी महाभयानक अशी दुसरी गोष्ट नाही. मग त्या शंकेचा सुरुंग संसाराला लागतो आणि एका क्षणात सारा सुखी संसार उद्ध्वस्त होतो.

मुकुंदाच्या संसारात तीच अवस्था निर्माण झाली होती. त्याच्या सुखी संसाराला संशयाचा सुरुंग लागला होता. त्याच्या दृष्टीने तो केवळ संशय नव्हता; तर ती निश्चित परिस्थिती होती आणि त्या परिस्थितीने त्याला सरळसरळ आव्हान दिलं होतं.

त्याने अंगावरचे कपडे उतरविले आणि तो बाहेरच्याच व्हरांड्यात बसून राहिला. बसून राहिला म्हणण्यापेक्षा खचून बसला. एखाद्या दुष्ट शक्तीने आपल्या अंगातील सारी शक्ती निपटून काढावी, असं त्याला वाटू लागलं. त्या परिस्थितीच्या रूपाने ती दुष्ट शक्ती त्याची दावेदारीण बनली होती.

तो मनाशी विचार करू लागला. सुनंदाला दिवस गेले आहेत ही गोष्ट निश्चित! घरात एक नवा पाहुणा येणार आहे, असं उमाकाकू नाही का म्हणाल्या? त्या स्पष्टच म्हणाल्या, अरुणच्या पाठीवर.. पुढचे शब्द आपल्याला ऐकू आले नाहीत; पण न ऐकताही त्या

शब्दांचा अर्थ आपल्याला सहज समजला. सुनंदा ओकाऱ्या काढीत होती, याचा दुसरा अर्थ कोणता?

'तिला दिवस गेले आहेत हे नक्की! हाय रे देवा!!'

असं मनाशी म्हणून त्याने आपल्या डाव्या हाताच्या दोन बोटांनी कपाळाभोवतीच्या शिरा दाबून धरल्या. त्या एकसारख्या उडत होत्या. मुकुंदाला वाटलं, या शिरा तुटत का नाहीत? म्हणजे सारंच प्रकरण निकालात निघेल.

मग आपल्या उजव्या हाताची बोटं मुडपून तो मनाशी काही हिशेब करू लागला. आज सप्टेंबरची ५ तारीख! आज बरोबर एक वर्ष आणि दोन दिवस झाले! त्या दिवशी आठल्ये डॉक्टरांच्या मागे लागून आपण ऑपरेशन करून घेतलं! त्या दिवशी आपण किती आनंदात होतो. डॉक्टरांनी सांगितलेला संयम सहा महिने पाळला म्हणजे मग जीवनात आनंदाशिवाय दुसरं काहीही नाही, मुलं होऊन त्यांचा भार वाहण्याची काळजी नाही. एकट्या अरुणला खूप-खूप मोठा बनविण्याची तेवढीच जबाबदारी आपल्यावर शिल्लक राहिली, अशा कल्पनेत आपण धुंद होतो. आनंदाशिवाय या जगात दुसरं काहीही नाही, दु:खाची कल्पना खोटी आहे, भ्रामक आहे, मायावी आहे, अशी त्या दिवशी आपली खात्री झाली होती, नाही का?

मुकुंदाचा हिशेब अगदी बरोबर होता. शाळेत असताना त्याचं गणित मुळीच चांगलं नव्हतं; पण जीवनातील सुखाचा हिशेब त्याला तोंडपाठ येत होता. मुलं न होण्याचं ऑपरेशन त्याने खरोखरच करून घेतलं होतं. त्याला एकच मुलगा झाला होता म्हणून आठल्ये डॉक्टरांनी त्याचं ऑपरेशन करण्यास साफ नकार दिला होता; पण मुकुंदाने आपला हट्ट सोडला नव्हता. तो त्या दिवशी आठल्ये डॉक्टरांच्या दवाखान्यात गेला तो ऑपरेशन करूनच घरी परत आला. त्यानंतर डॉक्टरांनी सांगितलेले सारे नियम त्याने अगदी हिशेबाने पाळले होते. त्यात अणुमात्रही फरक केला नव्हता. त्या गोष्टीला आज दोन दिवस झाले होते आणि आज शेजारच्या उमाकाकू

त्याला ऑफिसातून आल्याबरोबर सांगत होत्या की, तुझ्या घरात आता एक नवा पाहुणा येणार आहे म्हणून!

या साऱ्या गोष्टीचा त्याने घ्यायचा तोच अर्थ घेतला. ऑपरेशन करूनही सुनंदाला दिवस गेले आहेत या गोष्टीचा एकच अर्थ नव्हता का? तो अर्थ कटू होता, त्याने काढलेला निष्कर्ष सुनंदाच्या पूर्वायुष्याशी जमत नव्हता, त्याच्या कल्पनेतही ती गोष्ट बसणारी नव्हती; या साऱ्या गोष्टी त्याला कळत का नव्हत्या? पण त्या गोष्टी नुसत्या कळून काय उपयोग होणार होता? त्यामुळे परिस्थिती पालटणार थोडीच होती?

तो उठून आत जाणार, इतक्यात सुनंदाच टॉवेलने तोंड पुसतपुसत बाहेर आली आणि त्याच्याकडे आश्चर्याने बघत म्हणाली, ''हे काय, तुम्ही केव्हा आलात? आणि इथे काय बसलात? बरं नाही का?''

''आतापर्यंत बरं होतं; पण आता बरं राहील असं वाटत नाही.''

या त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून सुनंदा म्हणाली, ''तुम्ही आल्याचं मला कळलं कसं नाही?''

''कसं कळेल? ओकाऱ्या देण्याच्या आवाजात...''


मुकुंदाचं वाक्य पुरं होण्याच्या आधीच सुनंदाचा चेहरा एकदम उतरला आणि तिचा चेहरा उतरलेला बघून त्याचा संशय अधिकच बळकट झाला.

आता बरोबर परिस्थितीची निरगाठ बसली होती. ऑपरेशन करूनही सुनंदाला दिवस गेले आहेत ही गोष्ट मुकुंदाला समजली होती आणि आपण दिलेल्या ओकाऱ्या मुकुंदाला ऐकू गेल्या व त्यावरून त्याने जो अर्थ लावायचा तो लावला, ही गोष्ट सुनंदाला समजली होती.

परस्परांना समजलेल्या त्या एका चमत्कारिक घटनेने त्यांच्या सुखी संसारात विक्षेप निर्माण झाला होता. त्यांच्या संसारसुखाला सुरुंग लागला होता.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# रिगेटा

**भा. द. खेर**

*योगायोग, नियती, मानवी मन, स्त्री-पुरुष,*
*कला आणि जीवन यांचा कोलाज...*
*मानवी जीवनाचे दर्शन घडवी खास*

### कर्ज फिटले, ऋणको गमावला!

एकदम दिवे गेले. आत्ता होते... आत्ताच गेले. त्याच्या काळजात कुठेतरी हललं. दहा वाजून गेले होते. सारं शांत होतं. दिवे गेल्यामुळे तर जास्तच शांत वाटायला लागलं.

भकासही!

बापूच्या मनात विचार आला, आत्ता असणारे दिवे आत्ताच जातात. माणसाचंही तसंच असेल का? या क्षणी असलेलं माणूस दुसऱ्या क्षणी नसतं.

बापूनं उठून स्वत:च कंदील लावला. कंदिलाच्या त्या प्रकाशात कमलिनीचा चेहरा निस्तेज दिसत होता. जास्तच भयाण दिसायला लागला होता. कॅन्सरच्या दुखण्यानं ती आजारी होती. हे जीवघेणं दुखणं! अशा दुखण्यात माणूस असून नसल्यासारखं असतं. नसून असल्यासारखं वाटतं. खितपत पाडणारं दुखणं!

सारं घर झोपलं होतं. कोण जागणार? थोरला भाऊ, भावजय, त्यांची मुलं शेजारच्याच खोलीत कडी लावून झोपली होती. माणसं काही दिवस आजारी माणसाची काळजी घेणार. जास्त झालं तर त्याच्या बिछान्याभोवती बसून जागणार. रोज जागणारं माणूस जवळचं असावं लागतं.

बापूच्या मनात हा विचार आला. आपल्याशी म्हणाला, ''होय. जवळचं!''

पुन्हा त्याच्या मनात विचार आला, ''कमलिनी आता खरंच का आपल्या जवळची राहिलीय्?''

मग त्याचं त्यालाच वाटायला लागलं, या जगातून निघून जाणाऱ्या माणसाचं जवळचं असं कुणीच नसतं.

कंदील भडकला आणि एकदम विझला. तेल जास्त झालं होतं का सरलं होतं, कुणास ठाऊक! विजेचे दिवे आल्यापासून कंदिलाची किमया कुणाला माहीत होती!

दुरून ट्रॅन्झिस्टरचा आवाज येत असावा- गाण्याचे हेलकावे कानावर पडत होते– ''दुनिया जिसे कहते हैं । जादू का खिलौना...''

कंदिलाची क्षीण ज्योत तेवली आणि बापूच्या मनात स्मृतींची वात तेजाळली.

कमलिनीच्या रूपाने बापूच्या हातात दहा वर्षांपूर्वी हे जादूचं खेळणं आलं आणि त्या खेळण्याची बघताबघता माती झाली– 'मिल जाए तो मिट्टी है!' त्या खेळण्याची कुणी केली होती माती?

बापूला ऑफिसातला तो दिवस आठवायला लागला.

बापू साधा स्टेनो-टायपिस्ट होता आणि कमलिनी कामत ही त्याची

बॉस होती. त्या ऑफिसची वरिष्ठाधिकारी! बदली होऊन ती या ऑफिसात आली, तेव्हाच सारे लोक तिच्या बोलण्याचालण्यातील रुबाबानं दिपून गेले. पहिल्याच दिवशी बापूला तिनं 'शॉर्ट-हॅन्ड' घेण्यासाठी बोलावलं. बापूला आत्ताही तो प्रसंग जसाच्या तसा आठवतोय.

"आपलं नाव काय?"

"बर्वे..."

"किती झाली नोकरी?"

"फार नाही..."

"आत्ता मी एक पत्र सांगते. बसा. आजच्या आज जायला हवं–"

बापू संकोचून बसला. कमलिनी सांगायला लागली. बापू डिक्टेशन घेऊन उठला तेव्हा मनाशी म्हणाला, "काय मस्त इंग्लिश आहे! आपल्याला असं यायला हवं."

परंतु असं इंग्रजी यायची गोष्ट दूरच राहिली; पण सांगितलेल्या मसुद्यातही बापूनं पाच चुका करून ठेवल्या होत्या. तीन शब्दांच्या आणि दोन स्पेलिंगच्या! बाई सही करणार एवढ्यात चपापून म्हणाल्या, "मि. बर्वे, या चुका दुरुस्त करायला हव्यात. पुन्हा टाइपिंग करावं लागेल. सॉरी!"

वस्तुत: सॉरी बापूनं म्हणायचं; उलट बाईच दिलगिरी व्यक्त करीत होत्या. बापूला वाटलं, काय नम्रता आहे बाईची!

परंतु बाईची अदब त्याला नंतरच दिसायची होती. त्यानं पुन्हा पत्र टाइप केलं- एकदा नव्हे, तर दोनदा! पण चुकांनी पिच्छाच पुरवला होता. कामतबाई शांत होत्या. ऑफिसची वेळ संपत आली तेव्हा म्हणाल्या, "मि. बर्वे, आपण आता उद्या पाठवू हे पत्र!"

बापू भीत भीत म्हणाला, "पण आज जायला हवं होतं ना!'

कामतबाई हसून म्हणाल्या, "आज चुकीचं जाण्यापेक्षा उद्या सुधारून चांगलं पत्र गेलेलं बरं!"

दुसरे दिवशी पत्र गेलं; पण बापू मात्र पुरता शरमिंदा होऊन गेला होता. का? तर कामतबाई त्याला काहीच बोलल्या नव्हत्या म्हणून!

हे असंच चाललं होतं. बापू कधी पत्र उतरून घेण्यात तर कधी टाइप करण्यात चुका करत होता. कामतबाई त्याला मुळीच बोलत नव्हत्या.

एकदा बापूनं चुकांची कमाल केली, तेव्हा मात्र बाईंनी काहीसं कातावून

विचारलं, ''मि. बर्वे, तुम्हाला घरी काही त्रास आहे का?''

यावर बापूनं प्रश्नार्थक मुद्रेनं फक्त कामतबाईंकडे बघितलं.

''नाही, म्हणजे कामात तुमचं लक्ष... काही बायको-मुलांचा त्रास...''

ओशाळवाणा कटाक्ष टाकून बापू म्हणाला, ''बायकोच नाही तर मुलाबाळांचा प्रश्न कुठला?''

कामतबाई हसून म्हणाल्या, ''मग कसली हो काळजी? मस्त काम करायचं... मजा करायची...''

''पण मॅडम, फार पैसे बुडवले लोकांनी... सरकारचे कायदे...''

''म्हणजे?''

''वडिलोपार्जित थोडीफार सावकारी आहे. ती सांभाळायला नको का? थोरला भाऊ काही करत नाही. म्हणजे करता येत नाही. लढाईवर गेला होता आणि पाय गमावून परत आला. सारं मलाच बघावं लागतं. म्हणून...''

कामतबाईंनी सहज प्रश्न केला, ''पण मग एवढी सावकारी असताना तुम्हाला या नोकरीची काय गरज?''

''हा सावकार-नियंत्रण कायदा आमच्या मुळाशी आलाय ना? नाहीतर खरंच नोकरी केली नसती आणि तुम्हालाही हा त्रास दिला नसता; पण सांभाळून घ्या!''

पण पुढे कामतबाईंनाच सांभाळून घेण्याची पाळी बापूवर आली.

तसं पाहिलं तर गोष्टी फारच भराभर घडत गेल्या. घडलेल्या घटना आणि गेलेला कालावधी याचं गणित व्यस्त होऊन गेलं.

एके दिवशी कामतबाईंनाच बापूची काकुळती करावी लागली.

दुपारचा लंच-अवर होता. कामतबाईंनी सकाळीच बापूला सांगून ठेवलं होतं— ''मि. बर्वे, आज दुपारी आपण एकत्र लंच घेऊ. माझे वडील आपल्याला भेटायला येणार आहेत. त्यांचं काही काम आहे.''

पत्रातला मजकूर उतरून घेण्यापेक्षाही बापूला बाईंचं हे बोलणं अवघड वाटलं.

बाईंच्या तीर्थरूपांचं आपल्याकडे काम? कसलं बरं? 'त्या प्रकारचं काम' असणंच शक्य नाही. बाई आपल्यापेक्षा वयानं थोड्या मोठ्या आणि दर्जानं तर खूपच मोठ्या! मग?

परंतु बापूला फारसा तर्ककुतर्क करावाच लागला नाही. 'लंचअवर'

आला आणि बाईंचे पिताजीही बापूला भेटायला आले– कामासाठी!

त्यांचं बोलणं ऐकून बापू चकितच झाला. त्यांच्याच बोलण्यावरून बापूला समजलं की, कामतबाईंना पाठच्या दोन बहिणी आहेत. कोणत्याच बहिणीचं लग्न झालेलं नाही. सर्वांत धाकट्या बहिणीनं कुणाशीतरी भानगड केली होती आणि ती निस्तरण्यासाठी कामतबाईंच्या तीर्थरूपांना तीन हजार रुपये तातडीनं हवे होते.

बापूला त्यांचं काकुळतीचं आणि दीनवाणं बोलणं पटलं होतं. कामतबाईंचे वडील म्हणाले होते, ''पैसे मिळाले नाहीत तर माझ्यासारख्या बापाला जीव देण्याशिवाय दुसरं गत्यंतर कुठलं?''

बापूचं सामाजिक मन जागं होऊन त्यानं सहजगत्या म्हटलं, ''अलीकडच्या पालकांचा आपल्या मुलींवर ताबा राहिलेला नाही.''

त्याच बापुडवाण्या स्वरात कामतबाईंचे पिताजी म्हणाले, ''अलीकडच्या मुलींवर ताबा ठेवायला त्या शेळ्यामेंढ्या का आहेत? शिकल्यासवरल्या मुलींना काय बोलणार? त्यांची लग्नं लावून देण्याची आमची ऐपत तरी राहिलीय का? त्यांच्या त्या मुखत्यार आहेत...''

बापू पुन्हा बोलून गेला, ''मुखत्यार आहेत ना त्या; मग त्यांची पापं त्यांनी निस्तरावीत!''

''अहो बापूसाहेब, त्यांना त्याचं काहीच नाही. पापं करायची त्यांनी आणि निस्तरायची आम्ही! का तर आमच्या अब्रूसाठी! त्यांच्यापुढे अब्रूचा प्रश्नच नाही! आम्ही त्यांच्या जन्माचे धनी आणि कर्माचेही! काय सांगायचं?''

बापू बराच वेळ विचारमग्न झालेला दिसला. आपल्या बॉसच्या पिताजींना पैसे द्यायलाच हवेत हा व्यावहारिक विचार त्याला सुचला होता; परंतु तारणाचं काय? एवढी रक्कम तारणाशिवाय द्यायची?

कामतबाईंनी त्याचं मन ओळखलं असावं. त्या म्हणाल्या, ''मि. बर्वे, तुम्ही रक्कम देणार असाल तर तारणाची काळजी करू नका. मी आहे ना जामीन?''

बापू म्हणाला, ''छे छे! त्याचा प्रश्न नाही. बँकेत किती शिल्लक आहे ते आठवतोय''

त्याच्या मनात तारणाचाच प्रश्न होता. तो सुटल्यावर विचार केल्यासारखं करून म्हणाला, ''ठीक आहे. उद्या पैसे देतो... पण वर्षात मला पैसे परत

हवेतच!''

त्याचे पुन: आभार मानताना कामतबाईंचे पिताजी म्हणत होते, ''उपकार झाले बापूसाहेब! अहो, कोण कुणाला एवढी मदत करतो? वर्षात पैसे परत करीन... ताई आहेच.''

ते निघून गेल्यावर बापूही जायला उठला; पण कामतबाई म्हणाल्या, ''थांबता थोडा वेळ?''

''का... काही पत्र...''

''छे, आज पत्रांना सुट्टी!... पण थोडं बोलायचंय...''

बापूनं त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनं बघितलं, तेव्हा कामतबाई म्हणाल्या, ''हा प्रसंग वास्तविक आलाच नसता. माझी धाकटी बहीण पमी... भारी वाह्यात आहे. त्या मुलाबरोबर चांगली सहासात महिने हिंडली, फिरली. सारं काही केलं. आम्हाला वाटलं की, यांचं लग्न होणार! आमचा जातवाला... चांगला मुलगा... काही कमी नाही! पण एके दिवशी आम्हाला पमीनं येऊन सांगितलं की, आमचं लग्न होणार नाही म्हणून!''

तो प्रसंग कामतबाईंच्या मनासमोर जसाच्या तसा उभा राहिला.

संध्याकाळी त्या नुकत्याच घरी गेल्या होत्या. एवढ्यात पमी घरी आली. घरी आली ती तणतणतच! वडिलांनी आईच्या मायेनं विचारलं, ''काय ग झालं पमे?''

''अहो अप्पा, याला काय पुरुष म्हणायचं? सहा महिने झाले. मी त्याला सांगत्येय की, लग्न झाल्यावर आपण दोघांनी वेगळं बिऱ्हाड करायचं. मी त्याला चक्क सांगितलं, की तुझ्या त्या भरलेल्या गोकुळात मला राहायचं नाही. आई-वडील, पाच भाऊ, तीन बहिणी... अबब! अहो, घरच्या घरी क्रिकेटची टीम झाली! त्या टीमचे टोले कोण झेलत बसणार?''

अप्पांनी घाबरून विचारलं, ''मग?''

''मग काय?... तो म्हणाला, मी घर सोडणार नाही. मी म्हणाले, मी तुझ्या त्या क्रिकेट-टीममध्ये खेळणार नाही.''

''अग पण...''

''अप्पा, तुम्हाला माझ्या पोटातल्या गोळ्याची काळजी ना? आधी आपल्या पोटच्या गोळ्याची काळजी करा की!''

''काय करू ग पोरी? माझ्या तोंडाला काजळी फासलीस! चांगला

पोरगा हातचा दवडलास!''

कामतबाई आपल्या धाकट्या बहिणीला म्हणाल्या, ''पमे, काही लाजलज्जा नाही का तुला? चाळे करताना काही वाटलं नाही... आणि...''

पमी मख्खपणानं म्हणाली, ''अग चाळे कसले ताई? आपल्याला रेडिओ घ्यायचा झाला, टीव्ही घ्यायचा झाला तर आपण त्याची ट्रायल नको का घ्यायला! घेतली ट्रायल... नापसंत ठरवला!''

तिच्यापुढे सर्वांची हद्द झाली होती. अप्पा संतापून म्हणाले होते, ''निस्तरानिस्तरी करावी लागेल...''

त्यांचं बोलणं पुरतं व्हायच्या आतच पमी म्हणाली होती, ''तुम्हाला निस्तरानिस्तरी करायची असेल तर करा. मला त्याची गरज नाही. या नैसर्गिक गोष्टीत अब्रू कसली?''

अप्पांनी ताईला विनवलं होतं. पैशांची व्यवस्था करायला सांगितलं होतं.

कामतबाईंना ही सारी कर्मकथा आठवली. त्यांचं मन संतापानं फुलून गेलं. आपलं मन आवरून त्या बापूला म्हणाल्या, ''तुमचे उपकार मला जन्मात विसरता येणार नाहीत...''

बापू चाचरत म्हणाला, ''उपकाराची भाषा कसली? व्याजबट्ट्याचा आमचा व्यवसाय आहे...''

बापू निघून गेला. बापूनं तीन हजार रुपये कर्जाऊ मोजले. पैसे निस्तरानिस्तरीत खर्चही झाले; पण ते पैसे पुन्हा काही उभे राहिले नाहीत. कर्ज सहजी घेतलं जातं; पण ते सहजी कधी फिटत नाही. व्याज मात्र वाढतं. तीनचे चार हजार होतात. दिवसाबरोबर कर्जाचा आकडा वाढतो.

अप्पांचं कर्ज काही फिटलं नाही. व्याजही तुंबलं.

ज्या दीनवाण्या चेहऱ्यानं अप्पा हे कर्ज मागायला आले होते, त्याच दीनवाण्या चेहऱ्यानं एके दिवशी अप्पा आले. 'लंच अवर' होता; पण कामतबाई त्या दिवशी रजेवर होत्या.

खालच्या मानेनं अप्पा म्हणाले, ''बापूसाहेब, पुन्हा लाचारी पदरी घेऊन तुमच्याकडे आलो आहे. काय करणार? पमीसारखी पोर पदरात असली म्हणजे लाचारीच पदरी बांधल्यासारखी आहे... पोरीला मी मोकळं केलं. तिची नोकरी चाललीच होती. मी तिला हे पैसे मागितले. हळूहळू दे

म्हटलं. मला उलटून म्हणाली, ‘तुमच्या अब्रूसाठी हे पैसे खर्च केलेत. माझ्यासाठी नाही!’ काय कपाळ बोलणार तिच्यापुढे! वर्षभर पैसे मागत होतो... परवा घरातून निघून गेली... कुठे, कुणास ठाऊक.’’

बापूचं मन विरघळलं. फक्त एवढंच म्हणाला, ‘‘अरेरे!’’

अप्पा पुढे बोलू लागले, ‘‘माझा सारा भार आमच्या ताईवर! मग ती तरी काय करणार? दु:ख भोगण्यासाठी तिचा जन्म आहे की काय कुणास ठाऊक?’’

बापू गप्पच होता. काय बोलणार?

एकदम अप्पांनी विचारलं, ‘‘बापूसाहेब, तुमचं लग्न झालंय?’’

बापूनं नकारार्थी मान हलवली.

मग बापूकडे न बघता अप्पा अजीजीनं म्हणाले, ‘‘बापूसाहेब, मला एक भीक घालता का?’’

बापू त्यांच्याकडे बघत होता...

‘‘नाही हो जमलं तुमचं कर्ज परत द्यायला... आता मला एकच शक्य आहे. माझ्या पोटची हुंडी तुम्हाला देऊन मोकळं व्हायचं... आमची गुणी ताई...?’’

बापू वेड्यासारखा भकास मुद्रेनं बघत राहिला. कावराबावरा झाला. शब्दांचे अर्थही त्याला काही काळ कळेनासे झाले. अर्थशून्य शब्दात म्हणाला, ‘‘म्हणजे?’’

‘‘होय, म्हणजे आमच्या ताईला तुम्ही पदरात घ्या. बापूसाहेब, तुमचा पदर मोठा आहे... फार मोठा!’’

‘‘अप्पा, उद्या याल? विचार करतो...’’

‘‘उद्याच काय, रोज येईन... दहा वेळा येईन! भिकाऱ्याला भीक मगायची लाज धरून कसं चालेल? कंटाळा करून कसं चालेल?’’

काहीतरी बोलायचं म्हणून बापू म्हणाला, ‘‘आज बाई ऑफिसात आल्या नाहीत...’’

‘‘उद्याही येणार नाही कदाचित... हाय खाल्लीय बिचारीनं... शरमिंदी होऊन गेलीय्... देणं द्यायचं राहून गेलं; पण स्वत:चं सर्वस्व द्यायला तयार झाली; पण घेणारानं हे देणं घेतलं नाही तर काय...? या विचारानं घरी पडून राहिलीय.’’

बापूचं मन गलबललं. एकदम त्याच्या तोंडून अभावितपणानं शब्द बाहेर पडले, ''अप्पा, उद्या संध्याकाळी मी घरी येतो.''

बापू ठरल्याप्रमाणे त्यांच्या घरी गेला आणि त्यांच्या घरचा झाला. त्या दोघांचं लग्न लागलं आणि कर्ज फिटलं. कमलिनी कामत या कमलिनी बर्वे बनल्या.

कामतबाई सासरी पायगुणाच्या ठरल्या. त्यांच्या थोरल्या जावेला दोन मुली होत्या. कामतबाई बर्व्यांच्या घरी आल्या आणि त्यांच्या जाऊबाईला मुलगा झाला.

तिच्या जाऊबाई म्हणाल्या, ''आता पुढच्या वर्षी माझा हा मुलगा पायगुणी ठरणार! तुम्हाला मुलगा होणार!''

बापू त्यांना दटावून म्हणाला, ''वहिनी, व्याजासह चार हजाराचं कर्ज हिनं फेडल्याशिवाय मुलगा नाही आणि काही नाही बरं का!''

कमलिनीला ही थट्टा वाटली. वहिनी म्हणाली, ''भाऊजी, एवढंच ना? जाऊबाईंचा पगार मोठा आहे. चार-पाच महिन्यांतच तुमचं कर्ज सहज फिटेल!''

बापू हिशेबीपणानं म्हणाला, ''छे, छे! हिचा सारा पगार कर्जात थोडाच धरून घेणार? घरखर्च करून हिनं आपल्या पगारातून कर्ज फेडलं पाहिजे. सावकारानं घरचं कर्जही वसूल केलं पाहिजे!''

हे ऐकून कमलिनीला वाईट वाटलं; पण तरीही ती थट्टेच्या स्वरात म्हणाली, ''फेडीन बरं सारं कर्ज! मगच...''

पण तशी वेळ आलीच नाही! बापू पार बदलला होता. त्यानं आपल्या ऑफिसर पत्नीची बदली दुसरीकडे करून घ्यायला तिला भाग पाडलं होतं. हा स्टेनो-टाइपिस्टच होता; पण नवरेशाहीचं वारं त्याच्या अंगात पुरेपूर भिनलेलं होतं. मूल होऊ नये म्हणून भलतीसलती औषधं घ्यायला त्यानं कमलिनिला भाग पाडलं होतं. आपल्या ऑफिसातल्या चुका हा स्टेनो-टाइपिस्ट पार विसरला होता. कर्जाच्या पोटात त्यानं त्या गडप करून टाकल्या होत्या. कर्जफेड म्हणून विकत घेतलेल्या पत्नीवर त्याचा नवरेशाहीचा जुलूम चालला होता.

त्यांच्या संसारात नव्हाळीचे दिवस कधीच आले नव्हते.

लग्न झाल्याबरोबर ती म्हणाली होती, ''आपण नवीन फर्निचर घेऊ

या!''

बापूनं उत्तर दिलं होतं, ''असली श्रीमंती आपल्याला परवडणार नाही. जुन्या फर्निचरवर बसता येतंच की!''

खूप दिवसांनी ती म्हणाली होती, ''आपण आता डायनिंग टेबल घेऊ! बरं असतं!''

बापू ताड्कन म्हणाला होता, ''मला पाटच बसायला आवडतात. नसती श्रीमंती हवी कशाला?''

स्कूटर घ्यायची हे तिनं पक्कं केलं होतं; पण बापूनं तिला बसनंच ऑफिसात जायला लावलं होतं. पैसे तिचे होते; पण बापू तिचा नवरा होता, त्यामुळे बायकोच्या पैशावर त्याचाच हक्क होता. पैसा हेच बापूचं दैवत होतं.

लग्न झाल्यापासून एकत्र कुठे फिरायला जाणं नाही, नाटक, सिनेमाचं नाव नाही; परगावी जाणं तर त्याहून दूर!

बापू तिला सांगायचा, ''अंधारात बसून सिनेमा काय बघायचा? नाटकं तर घरोघरी चाललीत. प्रवासाला जाणं म्हणजे फुकट खर्च! त्यापेक्षा घर बरं! आणि पेन्शनरसारखं फिरायला जायचं?''

या सर्वांमागे 'फुकट खर्च' एवढंच बापूचं व्यावहारिक तत्त्वज्ञान होतं.

पत्नीच्या बाबतीत एक कर्तव्य मात्र तो बिनचूक पार पाडायचा. तिच्याच पैशानं तो तिच्या बड्या विम्याचे हप्ते वेळच्या वेळी भरायचा, बँकेचे रिकरिंग डिपॉझिट भरायचा, प्राप्तिकराचा तक्ता भरायचा, आणि तिच्याकडून ठोकून घरखर्च वसूल करायचा. या गोष्टी करण्यात त्याला कसलीही शरम वाटायची नाही. उलट, कर्तव्यपूर्तीचा आनंद मिळायचा.

कमलिनी शांतपणानं वागायची. आयुष्यातला उन्हाळा जणू तिनं पचवला होता. माहेरी सारा आनंद झालेला होता. पमी एका परजातीच्या लष्करी अधिकाऱ्याचा हात धरून पळून गेली होती. कमलिनीच्या पाठच्या बहिणीनं अंथरूण धरलं होतं. तिला क्षयाची भावना झाली होती. अप्पा एके दिवशी दुपारी रक्ताची गुळणी येऊन बोलता बोलता निघून गेले होते. आता आजारी असलेल्या पाठच्या बहिणीला पैसे देण्याची सोय नव्हती. बापू सावकार तिच्या पाठीशी सोटा घेऊन उभा होता.

कमलिनीला मुलांची केवढी हौस! परंतु प्रथम मूल होणार होतं, तेव्हा

ते होऊ नये यासाठी भलतीसलती औषधं घेतली आणि आता मूल हवंसं वाटलं तेव्हा त्या घेतलेल्या औषधांचा परिणाम म्हणून मूल होण्याची आशा दुरावली.

मूल व्हावं या आशेनं एके दिवशी ती डॉक्टरांकडे तपासणी करून घेण्यासाठी गेली. डॉक्टरांनी भलतीच शंका बोलून दर्शविली.

डॉक्टर म्हणाले, ''मुंबईला टाटा हॉस्पिटलमध्ये जाऊन तपासणी करायला हवी!''

टाटा हॉस्पिटलमध्ये जायचं म्हणजे कॅन्सर असणार, हे सर्वांनीच ताडलं. बापू मख्ख होता. हॉस्पिटलचा खर्च सरकारतर्फे मिळणार हे त्याला माहीत असल्यामुळे तो शांत होता. त्याच्या लेखी पत्नीच्या दुखण्यापेक्षा तीच बाब महत्त्वाची होती. पन्नास हजारांचा तिचा विमा आहे, ही खात्री त्याने पुन:पुन्हा करून घेतली. तो निर्धास्त झाला.

दुखण्याचा पाय पुढे पुढेच चालला. मधूनच कमलिनीला बरं वाटायचं. इतकं की, आपण या असल्या दुखण्यानं आजारी आहोत हे ती विसरून जायची. मग मोठ्या प्रेमानं ती बापूच्या जवळ जायची, त्याच्या कुशीत शिरायची आणि त्याच्याकडे प्रेमभरल्या नजरेनं बघत म्हणायची, ''मला किनई आता बरं वाटतंय. माझी एक इच्छा आहे. कराल पुरी?''

बापू गप्पच बसून राहायचा.

ती म्हणायची, ''आपण दोघं कुठेतरी विमानानं जाऊ या. मला फार हौस आहे. आपल्याला काय कमी आहे? जायचं ना?''

बापू डोळा लागल्याचं सोंग करायचा. पुन्हा ती आपली इच्छा प्रदर्शित करायची. बापू मग म्हणायचा, ''झोप आता! उद्या बघू; पण श्रीमंती प्रवास आपल्याला थोडाच परवडणार आहे?''

उदास मनानं ती त्याच्या खांद्यावर डोकं टेकून पडून राहायची; परंतु बापूला कधी गहिवर फुटायचा नाही. दयेचा पाझर यायचा नाही. देवाला कधी तो करुणा भाकायचा नाही. त्याचं जग पैक्याचं होतं. त्याचा देव वेगळा होता.

दिवे आले. बापू एकदम दचकला. एखादा चोर अंधारातून एकदम उजेडात आल्यावर दचकतो तसा! कमलिनी शांत पडली होती. उजेडात

दिसणारा तिचा चेहरा फारच भकास दिसत होता.

एकदम तिने डोळे उघडले. त्याच्याकडे बघितलं. क्षीण हास्य केलं. त्याला खुणेनं जवळ बोलावलं. त्याच्या दोन्ही कानशिलांवर हात ठेवून ती बोलायचा प्रयत्न करत होती; पण शब्द फुटत नव्हता; पण ती बोलली नेहमीचंच! आजवर अनेकवार बोलली होती तेच! तिचं गोळाबेरीज बोलणं असंच होतं- ''मला बरं वाटल्यावर आपण किनई विमानानं कुठेतरी जाऊ... मला फार आवडतं.''

त्याही स्थितीत बापूचा स्वभाव जागा होता. तो नेहमीप्रमाणे म्हणालाच, ''अगं, हा श्रीमंती प्रवास आपल्याला परवडणार नाही... बरं, तू आता शांत झोप बघू!''

तिनं डोळे मिटून घेतले. मध्यरात्र टळून गेली होती. तिचं विमान, एवढ्या लवकर येईल असं बापूला मुळीच वाटलं नाही. तिच्याबद्दल काही वाटावं हा बापूचा स्वभावच नव्हता.

तिला घेऊन जाणारं विमान आलं आणि भुर्रकन निघून गेलं. बापूच्या डोळ्याचं पातंही लवलं नाही.

सारं घर रडलं; पण बापूचे डोळे कोरडे होते. तो आपल्या वहिनीला एवढंच म्हणाला, ''कमलिनीचं मन सागरासारखं होतं. तिच्या अस्थींचं विसर्जन मी समुद्रात करणार!''


आणि खरोखरच बापूनं विमानानं तिच्या अस्थी मुंबईला नेल्या आणि समुद्रात अस्थींचं विसर्जन केलं.

त्याचा स्वभाव माहीत नसलेली काही माणसं म्हणाली, ''बापूचं बायकोवर प्रेम होतं! विमानानं त्यानं अस्थी नेल्या!''

आपल्या प्रिय पत्नीचा विमा, फंड आणि बँकेतली शिल्लक मिळून लाखाच्या वर रक्कम बापूच्या हाताला लागली होती. कर्ज पार फिटून गेलं होतं. ऋणको आता धनको बनला होता; पण इहलोकीची यात्रा संपल्यावर!

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# आयकॉन

**फ्रेडरिक फोरसाइथ**

अनुवाद
**डॉ. देवदत्त केतकर**

*तोतया नेत्याला करायचा होता रशियाचा सर्वनाश...*
*सीआयए ने त्याच्याभोवती आवळला पाश...*
*रहस्याची उतरंड रचणारी थरारक कादंबरी*

**तो एक विलक्षण** उन्हाळा होता. त्या उन्हाळ्यात एका ब्रेडच्या किमतीनं १० लाख रुबल्सची पातळी ओलांडली.

त्या उन्हाळ्यात सलग तिसऱ्या वर्षी पीकपाण्यानं दगा दिला. सलग दुसऱ्या वर्षी बेसुमार चलनवाढ झाली.

त्या उन्हाळ्यात दूरवर पसरलेल्या रशियन खेड्यांमधून माणसं प्रथमच कुपोषणानं मरण पावू लागली.



याच उन्हाळ्यात रशियन राष्ट्राध्यक्ष त्यांच्या आलिशान लिमोझिनच्या मागच्या सीटवर कोसळले, ते कायमचेच आणि त्याच वेळी एका म्हाताऱ्या झाडूवाल्यानं ऑफिसमधून एक दस्तऐवज चोरला.

त्यानंतर सारं काही बदलून गेलं.

तो १९९९चा उन्हाळा होता.

त्या दुपारी असह्य उकाडा होता. रशियाच्या कॅबिनेट मंत्रिमंडळाच्या इमारतीच्या फाटकाच्या आत एक आलिशान गाडी थांबली. ड्रायव्हरनं अनेकदा हॉर्न वाजवल्यानंतर तिथल्या रखवालदारानं घाईघाईनं केबिनमधून बाहेर येऊन ते अजस्त्र लाकडी फाटक उघडलं. राष्ट्राध्यक्षांच्या अंगरक्षकानं गाडीची खिडकी उघडून त्या रखवालदाराला सतर्क राहण्याची तंबी दिली. ती लांबलचक मर्सिडीज-६०० कमानींतून बाहेर पडून 'स्तराया प्लोश्चाद' रस्त्यावर आली. भेदरलेल्या रखवालदारानं कसाबसा सॅल्यूट ठोकला. तेवढ्यात मागोमाग रशियन बनावटीची 'चायका' गाडी बाहेर पडून मर्सिडीजच्या मागे निघाली. त्या गाडीत आणखी चार अंगरक्षक होते. त्यामागोमाग लिमोझिनही बाहेर पडली. दोन्ही गाड्या वळून दिसेनाशा झाल्या.

मर्सिडीजच्या मागच्या सीटवर रशियन राष्ट्राध्यक्ष चेर्कासोव हताशपणे विचारात गढून गेले होते. पुढच्या सीटवर लष्कराचा ड्रायव्हर आणि 'अल्फा ग्रुप'चा त्यांच्यासाठीचा खास व्यक्तिगत अंगरक्षक, असे दोघे होते.

मॉस्कोच्या परिघावरची बकाल वस्ती ओलांडून दोन्ही गाड्या शहराबाहेर पडल्या. त्या ग्रामीण भागात आता दुतर्फा झाडं आणि शेती दिसत होती. अध्यक्षांच्या मनात विलक्षण औदासीन्य दाटून आलं होतं. ते साहजिकच होतं. सतत आजारी असलेल्या बोरिस येल्त्सिन यांच्याकडून त्यांनी तीन वर्षांपूर्वी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली होती. या तीन वर्षांत देश भिकेला लागण्याच्या मार्गावर चाललेला ते बघत होते. ही तीन वर्षं त्यांच्या आयुष्यातली सर्वांत दुःखद वर्षं होती.

सन १९९५च्या हिवाळ्यात येल्त्सिन यांनी आर्थिक आणि सामाजिक सुधारणांचे तज्ज्ञ म्हणून त्यांची पंतप्रधानपदावर नेमणूक केली होती. ढासळती अर्थव्यवस्था सावरणं गरजेचं होतं. त्याच वेळी संसदेच्या–ड्युमाच्या निवडणुका झाल्या.

ड्युमाची निवडणूक महत्त्वाची असली तरी निर्णायक नव्हती. कारण गेल्या काही वर्षांत संसदेचे सर्व अधिकार टप्प्याटप्प्यानं राष्ट्राध्यक्षांच्या हाती गेले होते. हा सगळा येल्त्सिन यांचा प्रताप. मूळ सैबेरियन असलेल्या येल्त्सिन यांनी १९९१मध्ये रणगाड्यांवर स्वत: स्वार होऊन लष्करी उठाव थोपवला होता आणि त्याबद्दल त्यांचं रशियातच नव्हे; तर पाश्चात्त्य देशांतही लोकशाहीचा खंदा लढवय्या म्हणून कौतुक झालं होतं. आता मात्र आजारामुळे ते शारीरिक दृष्टीनं पार गलितगात्र होऊन गेले होते.

तीन महिन्यांत त्यांना दोन वेळा हृदयविकाराचा झटका येऊन गेला होता. त्यातून ते सावरत असले, तरी औषधांमुळे शरीरावर सूज आली होती; त्यामुळे 'स्पॅरो हिल्स'च्या रुग्णालयातल्या रुग्णशय्येवरूनच त्यांना सगळी निवडणूक पाहावी लागली होती. त्यांचे राजकीय चेले तिसऱ्या स्थानावर ढकलले गेल्याचं पाहणंही त्यांच्या नशिबी आलं; पण पाश्चात्त्य लोकशाहीसारखा रशियात हा कळीचा मुद्दा नव्हता; कारण सर्व सत्ता येल्त्सिन यांच्याच हाती एकवटली होती. अमेरिकेप्रमाणे रशियातही राष्ट्राध्यक्षांना सर्वाधिकार असतात; पण अमेरिकेत असतो तसा रशियात अध्यक्षांवर कोणताही अंकुश नसतो; त्यामुळे येल्त्सिन सरळ एकेक फर्मान काढून राज्य करू शकत होते आणि तसंच त्यांनी केलं.

पण त्या निवडणुकांमुळे निदान जनमताचं वारं कोणत्या दिशेनं वाहतंय याचा अंदाज आला; आणि तो जून १९९६मध्ये होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीत अत्यंत महत्त्वाचा ठरणार होता.

त्यातही विरोधाभास असा की, १९९५मध्ये राजकीय क्षितिजावर एक शक्ती म्हणून कम्युनिस्टांचा पुन्हा उदय झाला. ७० वर्षांची कम्युनिस्ट हुकूमशाही, गोर्बाचेव यांच्या सुधारणा पाच वर्षे आणि पाच वर्षांची येल्त्सिन यांची राजवट अनुभवून, रशियन जनता पुन्हा गतकाळच्या स्मरणरंजनाकडे वळू लागली.

कम्युनिस्टांचा नेता गेनाडी झ्युगानोव यानं गतकाळचं सोनेरी चित्र उभं केलं : रोजगाराची हमी, निश्चित पगार, परवडणारं अन्न, कायदा व सुव्यवस्था; पण त्याच वेळी रशियन हेर खातं केजीबीची जुलमी दडपशाही, गुलाग बेटांवरच्या सक्तमजुरीच्या छळछावण्या किंवा मुक्त संचार आणि व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी याबद्दल मात्र त्यानं अवाक्षरही काढलं नव्हतं.

बराच गाजावाजा झालेल्या दोन उद्धारकर्त्यांबाबत रशियन जनतेचा पूर्ण भ्रमनिरास झाला होता–भांडवलशाही आणि लोकशाही. पैकी दुसरा शब्द तर आता हेटाळणीपूर्वकच वापरला जात होता. सर्वव्यापी भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी पाहता, अनेक रशियनांच्या मते ती एक प्रचंड थापच होती. संसदीय निवडणुकीनंतर छुप्या कम्युनिस्टांचे सर्वाधिक प्रतिनिधी ड्युमामध्ये निवडून गेले होते आणि त्यांना सभापतींच्या नेमणुकीचा अधिकार मिळाला होता.

विरुद्ध टोकाला व्लादिमिर झिरिनोवस्कीचे नव फॅसिस्ट होते. विरोधाभास म्हणजे त्यांच्या पक्षाचं नाव होतं-पुरोगामी लोकशाही पक्ष (लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी). या लोकभावना भडकावणाऱ्या आणि अश्लील भाषा वापरणाऱ्या नेत्याला सुरुवातीला यश मिळालं खरं; पण लवकरच त्याचा प्रभाव ओसरू लागला. तरीही त्याच्या पक्षाला दुसरा क्रमांक मिळाला.

आणि आर्थिक-सामाजिक सुधारणा राबवणाऱ्या मध्यममार्गी पक्षांना तिसऱ्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

पण या निवडणुकांमुळे १९९६मध्ये होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीचा पाया घातला गेला. ड्युमासाठी ४३ पक्षांनी निवडणूक लढवली होती; पण आता एकत्र येण्यावाचून पर्याय नसल्याचं बहुतेक महत्त्वाच्या पक्षांच्या नेत्यांच्या लक्षात आलं होतं.

त्या उन्हाळ्यात छुप्या कम्युनिस्टांनी त्यांचा नैसर्गिक मित्र, शेतकरी कामगार पक्षाशी हातमिळवणी करून सोशालिस्ट युनियन हा पक्ष स्थापन केला. त्यात पूर्वाश्रमीच्या सोव्हिएत युनियनमधल्या दोन शब्दांचा खुबीनं अंतर्भाव केला होता. त्यांचा नेता झ्युगानोव होता.

अतिउजव्या पक्षांचेदेखील एकत्र येण्याचे प्रयत्न चालू होते; पण झिरिनोवस्कीनं त्याला कठोरपणे विरोध केला. 'व्लाद द मॅड'ला इतर उजव्या पक्षांच्या मदतीशिवाय सत्तेवर येण्याची खात्री होती.

रशियात अध्यक्षीय निवडणूक फ्रेंच धर्तीवर दोन टप्प्यांत घेतली जाते. पहिल्या फेरीत सर्व उमेदवारांची आपसात स्पर्धा होते आणि पहिल्या दोन क्रमांकांच्या उमेदवारांसाठी दुसऱ्या फेरीत मतदान घेतलं जातं. तिसरा क्रमांक निरुपयोगी ठरतो. झिरिनोवस्की तिसरा आला आणि त्यानं उजव्या गटातील विचारवंतांचा रोष ओढवून घेतला.

डझनभर मध्यममार्गी पक्षांनी लोकशाही आघाडी स्थापन केली; पण येल्त्सिन पुन्हा जिंकून अध्यक्ष होण्याइतके तंदुरुस्त असतील का, हा कळीचा प्रश्न होता.

त्यांच्या ऱ्हासाचं कारण इतिहासकारांनी एकाच शब्दात सांगितलं- चेचन्या.

चेचेन लोक डोंगराळ भागात राहणारे लढवय्ये होते. त्यांच्या स्वयंघोषित नेत्याची रशियापासून वेगळं होऊन पूर्ण स्वातंत्र्याची मागणी होती. अखेर येल्त्सिनचा संयम संपला आणि त्यांनी रशियाच्या पूर्ण लष्करी व हवाई शक्तिनिशी चेचन्यावर हल्ला केला. चेचेन लोकांची बंडखोरी पूर्वीच्या झार राजांच्या काळापासून चालत आली होती. अनेक झार सम्राटांनी व नंतर क्रूरकर्मा जोसेफ स्टालिननं केलेल्या हत्याकांडांना ते पुरून उरले होते आणि त्यांच्या लहानशा भूप्रदेशावर सतत आक्रमणं आणि विध्वंस होऊनही ते लढत राहिले होते.

चेचन्याविरुद्ध रशियाचं पूर्ण लष्करी सामर्थ्य वापरण्याचा निर्णय घिसाडघाईचा ठरला. झटपट आणि दिमाखदार विजय मिळण्याऐवजी पदरी अपयश आलं. रशियन सैनिकांच्या मृतदेहांनी भरलेल्या रेल्वेगाड्या परत येऊ लागल्या आणि हे सर्व जगानं प्रत्यक्ष पाहिलं.

चेचन्याची राजधानी ग्रोझ्नीमध्ये आता फक्त भग्नावशेष उरले होते, तरीही चेचेन बंडखोरांजवळ भ्रष्ट रशियन सेनाधिकाऱ्यांकडून मिळालेला भरपूर शस्त्रसाठा होता. ते डोंगरदऱ्यांत पळाले. तिथून त्यांना हुसकावून काढणं अशक्य ठरलं. अफगाणिस्तानमध्ये रशियन सैन्याची व्हिएतनामसारखीच गत झाली होती. आता कॉकेशस पर्वतरांगांमध्ये त्याचीच पुनरावृत्ती होत होती.

आपण खास रशियन परंपरेतले लोहपुरुष आहोत, हे सिद्ध करण्याचा येल्त्सिन यांचा अट्टहास अपयशी ठरला होता. त्यांना ज्याची आस लागली होती, त्या विजयानं त्यांना हुलकावणी दिली. परत येताना आपल्या तरुण मुलांची प्रेतं पाहून रशियन जनमत चेचन्याविरुद्ध संतप्त झालं; पण तितकाच राग त्यांना विजय मिळवू न शकलेल्या नेत्याचा आला.

◆

**१६ जुलै ते १५ ऑगस्ट २०२५ दरम्यानचे दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ जुलै दरम्यान खास सवलत**

**१६ जुलै - जॅकलिन गोल्ड यांचा जन्मदिन**

'अ वुमन्स करेज' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४०/-**

**१७ जुलै - अर्ल स्टॅन्ले गार्डनर यांचा जन्मदिन**

'द केस ऑफ द केअरलेस क्यूपिड', 'द केस ऑफ द काउंटरफिट आय', 'द केस ऑफ द क्रिमसन किस', 'द केस ऑफ द क्रुकेड कँडल', 'द केस ऑफ द डेडली टॉय', 'द केस ऑफ द डेम्यूर डिफेन्डन्ट', 'द केस ऑफ द हॉन्टेड हसबन्ड', 'द केस ऑफ द हाऊलिंग डॉग', 'द केस ऑफ द आइस-कोल्ड हॅन्ड्स', 'द केस ऑफ द लकी लूझर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०९०/- । सवलत किंमत १४४९/-**

**१८ जुलै - लॉरेन स्क्रग्ज यांचा जन्मदिन**

'एक लढा असाही...' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

**१९ जुलै - सूर्यकांत जाधव यांचा जन्मदिन**

'आघात', 'अस्मिता' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ३९९/-**

**१९ जुलै - स्नेहलता जोशी यांचा जन्मदिन**

'अजून नाही जागी राधा', 'द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट','दडलेला इतिहास' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११५५/- । सवलत किंमत ७१०/-**

**२० जुलै - डॅनियन ब्रिंकली यांचा जन्मदिन**

'सीक्रेट्स ऑफ द लाइट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १४०/-**

**२० जुलै - पोलेत बूर्ज्वा यांचा जन्मदिन**
'फ्रँकलिन मालिका (२३ पुस्तके)' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२५०/- । सवलत किंमत ८८६/-**

---

**२१ जुलै - माधवी देसाई यांचा जन्मदिन**
'असं म्हणू नकोस', 'धुमारे', 'हरवलेल्या वाटा', 'कांचनगंगा', 'कथा सावलीची', 'किनारा', 'मंजिरी', 'नियती', 'प्रार्थना', 'सागर', 'शुक्रचांदणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १६७०/- । सवलत किंमत ११९९/-**

---

**२१ जुलै - अर्नेस्ट हेमिंग्वे यांचा जन्मदिन**
'घणघणतो घंटानाद' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३६९/-**

---

**२१ जुलै - मायकेल कॉनेली यांचा जन्मदिन**
'सिटी ऑफ बोन्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २२९/-**

---

**२२ जुलै - धनंजय बिजले यांचा जन्मदिन**
'लढा लोकपालचा... उद्रेक आम आदमीचा', 'अण्णा हजारे : भ्रष्टाचाराच्या विरोधातील भारतीय लढ्याचा चेहरा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**२३ जुलै - जीतेंद्र दीक्षित यांचा जन्मदिन**
'३५ दिवस : २०१९ने दिली महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी', 'महाराष्ट्रातील महाबंड', 'लाल बर्फाचे खोरे', 'मुंबई आफ्टर अयोध्या' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १४७०/- । सवलत किंमत ९५६/-**

---

**२५ जुलै - स. शं. देसाई यांचा जन्मदिन**
'अखेरची लढाई', 'महापर्व', 'पहिले जागतिक महायुद्ध', 'दुसरे जागतिक महायुद्ध', 'चंबळेच्या पलीकडे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७९०/- । सवलत किंमत ११६३/-**

---

**२८ जुलै - कॅरोल हिगिन्स क्लार्क यांचा जन्मदिन**

'झॅप्ड' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत १०९/-**

---

**२९ जुलै - तिमिरी एन. मुरारी यांचा जन्मदिन**

'द तालिबान क्रिकेट क्लब' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९२/-**

---

**२९ जुलै - करेन रोझ यांचा जन्मदिन**

'स्क्रीम फॉर मी', 'डाय फॉर मी', 'आय कॅन सी यू' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १९७५/- । सवलत किंमत १११६/-**

---

**२९ जुलै - प्रभाकर परांजपे यांचा जन्मदिन**

'काळोखाचे थेंब', 'पत्रकारितेची मुलतत्त्वे' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३३०/- । सवलत किंमत २१४/-**

---

**२९ जुलै - जे.आर.डी. टाटा यांचा जन्मदिन**

'जेआरडी टाटा यांची पत्रं', 'कीनोट : जे.आर.डी. टाटा', 'टाटा – एका कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती', 'जेआरडी : एक चतुरस्त्र माणूस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२३०/- । सवलत किंमत ८००/-**

---

**३० जुलै - नरेन्द्र मोहन यांचा जन्मदिन**

'कमबख्त निंदर' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५०/-**

---

**३० जुलै - डॉमिनिक लॅपिए यांचा जन्मदिन**

'फ्रिडम अॅट मिडनाइट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१५/-**

---

**खालील संचांवर १ ते १५ ऑगस्ट दरम्यान खास सवलत**

**१ ऑगस्ट - हर्मन मेलव्हिल यांचा जन्मदिन**

'शिस्तीचा बळी', 'पाचूचे बेट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २३१/-**

---

**१ ऑगस्ट - रॉबर्ट जेम्स वॉलर यांचा जन्मदिन**

'अद्वैत' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २१९/-**

---

**२ ऑगस्ट - दिपा महानवर यांचा जन्मदिन**

'विमुक्ती' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**२ ऑगस्ट - कॅरोल ओ'कॉनर यांचा जन्मदिन**

'यशस्वी नेतृत्व' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत ११९/-**

---

**३ ऑगस्ट - लिऑन युरिस यांचा जन्मदिन**

'एक्झोडस' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ३३९/-**

---

**४ ऑगस्ट - जागतिक मैत्रिदिन**

'चौघीजणी', 'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा', 'फाईव्ह पॉइंट समवन', 'द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ', 'एक होता मित्र', 'दोस्त', 'अदान अॅण्ड ईव्हा', 'मैत्री अशी आणि तशी...', 'बेधुंद', 'केवळ मैत्रीसाठी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २४३५/- । सवलत किंमत १५४६/-**

---

**४ ऑगस्ट - राजीव तांबे यांचा जन्मदिन**

'बब्बड मालिका भाग १', 'बब्बड मालिका भाग २', 'बंटूचा टिक टिक मित्र', 'ससोब-हसोबा मालिका भाग १', 'ससोबा-हसोबा मालिका भाग २', 'अजब डोंगर आणि इतर कथा', 'राजाचा घोडा आणि इतर कथा', 'फुले फुलली आणि इतर कथा', 'चकाचक चंपू', 'उडणारी मगरूली', 'पुस्तक

वाचणारे फुलपाखरू', 'सू-सू अंतराळवीर आणि फुलपाखरू', 'रंगीत घोटाळा आणि छोटे जवान' या सर्व संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३०४५/- । सवलत किंमत २१३२/-**

**४ ऑगस्ट - लीना दामले यांचा जन्मदिन**

'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'कथारूपी खगोलशास्त्र', 'अशक्य भौतिकी', 'नाते ब्रह्मांडाचे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२५०/- । सवलत किंमत ८१३/-**

**४ ऑगस्ट - रिचर्ड प्रेस्टन यांचा जन्मदिन**

'मायक्रो', 'द डेमन इन द फ्रीजर', 'द हॉट झोन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९७०/- । सवलत किंमत ५८२/-**

**५ ऑगस्ट - डेव्हिड बॉल्डाची यांचा जन्मदिन**

'द सिम्पल ट्रूथ', 'सेव्हिंग फेथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९४०/- । सवलत किंमत ४६९/-**

**५ ऑगस्ट - टॉड बर्पो यांचा जन्मदिन**

'स्वर्गाचा साक्षात्कार' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**६ ऑगस्ट - हिरोशिमा / परमाणू दिन**

'वॉर्सा ते हिरोशिमा', 'नागासाकी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२९५/- । सवलत किंमत ८१७/-**

**७ ऑगस्ट - ग्रेग चॅपल यांचा जन्मदिन**

'फिट फॉर ५०+ फॉर मेन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १३०/- । सवलत किंमत ९६/-**

**८ ऑगस्ट - वैशाली कार्लेकर यांचा जन्मदिन**

'विक्रम वेताळ मालिका भाग १', 'विक्रम वेताळ मालिका भाग २', 'विक्रम वेताळ मालिका भाग ३' या तीन भागांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८४०/- । सवलत किंमत ६३१/-**

**८ ऑगस्ट - सारा ड्युनांट यांचा जन्मदिन**

'सेक्रेड हार्ट्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१४/-**

**८ ऑगस्ट - शंकर पाटील यांचा जन्मदिन**

'आभाळ', 'बंधारा', 'भेटीगाठी', 'धिंड', 'गारवेल', 'घालमेल', 'इल्लम', 'जुगलबंदी', 'कथा अकलेच्या कांद्याची', 'खुळ्याची चावडी', 'खुशखरेदी', 'लवंगी मिरची कोल्हापूरची', 'पाटलांची चंची', 'पाऊलवाटा', 'फक्कड गोष्टी', 'शापित वास्तू', 'श्रीगणेशा', 'ताजमहालमध्ये सरपंच', 'टारफुला', 'वळीव', 'वावरी शेंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३७१०/- । सवलत किंमत २५९७/-**

**१० ऑगस्ट - फुलनदेवी यांचा जन्मदिन**

'मी फुलनदेवी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २६९/-**

**११ ऑगस्ट - वि. स. वाळिंबे यांचा जन्मदिन**

'नेताजी', 'वॉर्सा ते हिरोशिमा', 'वुइ, दि नेशन', 'वुइ, दि पीपल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२९०/- । सवलत किंमत १४४३/-**

**१३ ऑगस्ट - आचार्य अत्रे यांचा जन्मदिन**

'आचार्य अत्रे बारा गावचं पाणी', 'काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४४०/- । सवलत किंमत २६९/-**

**१५ ऑगस्ट - स्वातंत्र्य दिन**

'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया', 'फ्रीडम ॲट मिडनाइट', 'मोहनदास', 'परमवीरचक्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २३१५/- । सवलत किंमत १३८९/-**

◆

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

एका राजचिन्हावरून
सुरू झालेल्या
जीवघेण्या पाठलागाची
थरारक, उत्कंठावर्धक कथा

# अ मॅटर ऑफ ऑनर

अनुवाद
**सविता दामले**








मास्टर स्टोरी टेलर जेफ्री आर्चर
यांच्या अफाट कल्पनाशक्तीचा
अचाट नमुना

# फर्स्ट अमंग इक्वल्स

अनुवाद
**मोहन गोखले**




# जेफ्री आर्चर

**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/07/2025 Posting Date : 11/07/2025

## आवर्जून वाचावं














## मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति,